मासिक वार्तापत्र • अंक 22 • ऑक्टोबर 2021 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने



# कामगार बिगुल

**नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक**


एव्हरग्रांड संकट: चीनमध्ये गृहनिर्माण उद्योग गंभीर संकटात 5

पेगासस: दमनाचे, जनतेवर पाळत ठेवण्याचे नवे हत्यार 8

तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाची 75 वर्षे 12


# लखीमपूर खेरी हत्याकांडांचा निषेध असो!

## फॅसिस्ट भाजपच्या लोकशाही विरोधी धोरणांना हाणून पाडा!

उत्तरप्रदेशामध्ये लखीमपूर खेरी येथे भाजपचे केंद्रिय गृहराज्यमंत्री अजय मिश्र टेनी यांच्या मुलाने, आशिष मिश्र याने, आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांवर गाडी चालवून त्यांना चिरडून ठार मारले. या निर्घृण हत्याकांडाचा तीव्र निषेध करत कामगार वर्गाने लोकशाही-नागरी अधिकारांवर फॅसिस्ट भाजपने चालवलेल्या हल्ल्याला तीव्र विरोध केला पाहिजे.

3 ऑक्टोबर 2021 रोजी उत्तरप्रदेशाचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य हे बनबिरपूर या गावी एका शाळेकडून सत्कार करवून घ्यायला गेले होते. देशाच्या थोड्या भागात गेले वर्षभर चालू असलेल्या शेतकरी आंदोलनाचा भाग असलेल्या अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या हेलिकॉप्टरला घेराव घालायचे ठरवले. तेव्हा उपमुख्यमंत्र्यांनी रस्त्याने येण्याचे ठरवले. यावर बनबिरपूर आणि तिकुनिया या गावांना जोडणाऱ्या सडकेवर शेतकऱ्यांनी आंदोलन चालू केले. याच आंदोलकांच्या अंगावर अत्यंत बेमुर्वतपणे गाडी चालवत आशिष मिश्रा याने 4 शेतकऱ्यांना आणि एका पत्रकाराला चिरडून टाकले. प्रतिक्रियेमध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये भाजपचे तीन कार्यकर्ते ठार झाले आहेत. देशभरामध्ये या घटनेनंतर तीव्र संतापाचे वातावरण आहे.

गुन्हेगारांना पक्षामध्ये आश्रय देणे आणि त्यांना “पावन” करून घेणे हे तर फॅसिस्ट भाजपचे धोरणच राहिले आहे. इथे तर खुद्द केंद्रिय गृहराज्यमंत्र्याचा मुलगाच हत्याकांडात सामील असल्यामुळे कारवाई लागलीच होणार नाही हे स्पष्टच होते. देशभरामध्ये निर्माण झालेल्या दबावामुळे शेवटी आशिष मिश्र याला अटक करण्यात आली असली तरी केंद्रिय गृहराज्यमंत्री अजय मिश्र मागे संपूर्ण भाजप

**संपादक मंडळ**

एकजुटीने उभा आहे आणि त्यांना वाचवण्यात लागला आहे. लोकशाही चेतना आणि लोकशाही संस्था जास्त विकसित असलेल्या कोणत्याही भांडवली लोकशाही देशात अशा घटनेनंतर मंत्र्यांना लागलीच राजीनामा द्यावा लागला असता. परंतु फॅसिझमच्या काळात आणि मागासलेल्या, अल्प-विकसित लोकशाही चेतनेच्या भारतामध्ये हत्याकांडानंतर सुद्धा मंत्री थाटात मिरवू शकतात!

### लोकशाही अधिकारांसाठी का लढले पाहिजे?

हमीभावाच्या मागणीभोवती संघटित झालेले शेतकरी आंदोलन हे धनिक शेतकरी वर्गाच्या हिताची मागणी घेऊन उभे आहे. हमीभावाचा फायदा फक्त मूठभर धनिक शेतकऱ्यांनाच मिळतो आणि हमीभावाद्वारे त्यांना सरकार बाजारातील नफ्याच्या वर वरकड नफ्याची हमी देते. हमीभावाची मागणी ही शहरी कामगारवर्गाच्या, गरीब शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या हिताविरोधात आहे कारण हमीभावामुळे बाजारात अन्नधान्याचे भाव वाढतात आणि ज्यांचे उत्पन्न मुख्यत्वे मजुरीतून येते अशा सर्वांनाच महागाईचा फटका बसतो. हे आंदोलन जरी आपल्या, कामगार वर्गाच्या, हिताविरोधात असले तरीही इतर सर्वांच्या (फॅसिस्ट सोडून, कारण ते लोकशाही मूल्य मानतच नाहीत) जनांदोलनांचे दमन जेव्हा राज्यसत्ता करते, तेव्हा त्या दमनाला विरोध करणे, आंदोलनकर्त्यांच्या लोकशाही-नागरी हितांकरिता लढणे हे कामगार वर्गाचे सुद्धा उत्तरदायित्व बनते. का, ते समजून घेतले पाहिजे.

हे खरे आहे की भांडवलदार वर्गाच्या हिताकरिता उभी असलेली लोकशाहीची संरचना, जिला आपण भांडवली लोकशाही म्हणतो, ती जनतेला मर्यादित लोकशाही अधिकारच देते. भारताच्या राज्यघटनेमध्ये अत्यंत कमजोर असे लोकशाही अधिकार दिलेले आहेत आणि राज्यसत्तेला वाटेल

पान 6 वर

# नॅशनल मॉनेटायझेशन पाईपलाइन :
# जनतेची संपत्ती भांडवलदारांना सुपूर्द करण्याचा आणखी एक उपक्रम

**सुस्मित**

अलीकडेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 6 लाख कोटी रुपयांच्या नॅशनल मॉनेटायझेशन पाईपलाइन (राष्ट्रीय चलनीकरण पाईपलाईन) या उपक्रमाची घोषणा केलीये. या उपक्रमाअंतर्गत रस्ते, रेल्वे, उर्जा, खाणी आदी क्षेत्रातील ब्राउनफिल्ड प्रकल्प खाजगी उद्योगांना भाडेतत्त्वावर देण्यात येतील. ब्राउनफिल्ड प्रकल्प म्हणजे असे प्रकल्प जिथे आधीपासूनच गुंतवणूक झालेली आहे आणि उपलब्ध असलेल्या प्रकल्पातच नव्याने गुंतणूक करून उत्पादन करणे.

अर्थमंत्र्यांनी कितीही जरी सांगितले की प्रकल्पाची मालकी सरकारकडेच राहिल तरी हा उपक्रम म्हणजे मागच्या दाराने सार्वजनिक प्रकल्प कवडीमोलाच्या दराने खाजगी प्रकल्पांना सोपवण्याचे नियोजन आहे. या घोषणेचा अर्थ आहे की देशातील कामगार कष्टकऱ्यांच्या मेहनतीवर उभे राहिलेले अनेक सार्वजनिक प्रकल्प दीर्घ काळासाठी भांडवलदारांना सोपवण्यात येतील. थोडक्यात आपलीच संपत्ती घशात घालून पुन्हा आपल्याच श्रमाच्या शोषणातून धनाढ्य भांडवलदार वरकड नफा कमावत अजून धनाढ्य व्हायला मोकळे ! पण फॅसिस्ट भाजप जो मोठ्या भांडवलदाराची चाकरीच करतो त्याने अशी योजना आणणे यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही! आणि ही काही पहिली घटना सुद्धा नाही. यासाठी आपण इतिहासाकडे नजर फिरवली पाहिजे.

अशा प्रकारच्या खाजगीकरणाच्या, सार्वजनिक संपत्ती मोठमोठ्या उद्योगपतींच्या घशात घालणयच्या धोरणांची सुरूवात कॉंग्रेसने 1980 च्या दशकापासूनच केली होती आणि ज्याची परिणती 1992 मध्ये ज्याला खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाची (खाउजा) धोरणे म्हणतात त्यात झाली. या धोरणांनी देशी आणि विदेशी भांडवलदारांना नफा कमावण्याची पूर्ण सूट दिली गेली. एकीकडे उद्योगपतींना कराच्या पैशांतून सवलती देण्यासाठी जनकल्याण्याच्या योजना, आरोग्य, शिक्षण, इत्यादींवर सरकारने खर्च कमी केला आणि दुसरीकडे भांडवलदारांसाठी कर्जमाफी, स्वस्त दरात कर्ज, विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) जिथे कामगार कायद्यातून सूट मिळते अशी धोरणे लागू केली. याच धोरणांनी गरीब आणि श्रीमंत यांतील दरी पूर्वीपेक्षा अधिक वेगाने वाढत गेली. ज्या देशात कोट्यवधी लोकांना पुरेसे पोषणही भेटत नाही, त्या देशातील अब्जपती फोर्ब्स नियतकालिकानुसार जगात संख्येत तिसऱ्या स्थानावर आहेत. वरच्या 10% लोकसंख्येकडे 73% संपत्ती आहे. भाजपा कॉंग्रेसच्या याच धोरणांना अधिक वेगाने पुढे नेत आहे आणि जे काही उरले-सुरले सार्वजनिक क्षेत्र आहे त्याला भांडवलदारांकडे सोपवत आहे.

### नॅशनल मॉनेटायझेशन पाईपलाइन नक्की काय आहे?

नॅशनल मॉनेटायझेशन

पान 7 वर

# कविता : भिकारी

भिकारी आले
नवयुगाचे मसीहा बनून
लोकांना अज्ञान, निरक्षरता आणि निर्धनतेपासून
मुक्ती देण्यासाठी
अद्भुत वक्तृत्व, लेखन-कौशल्य आणि संघटन क्षमतेने सज्ज
स्वस्थ-सुंदर-सुसंस्कृत भिकारी आले
आमच्या वस्तीमध्ये
आशिया-आफ्रिका-लॅटिन अमेरिकेच्या
तमाम गरिबांमध्ये
ज्याप्रकारे पोहचले ते यान व वाहनावर स्वार होऊन
त्याच प्रकारे आले ते आमच्यामध्ये
भीक, दया, समर्पण आणि भयाच्या संस्कृतीचे प्रचारक
जुन्या मिशनऱ्यांपेक्षा वेगळे होते ते,
तसे त्यांचे दातेही भिन्न होते
आपल्या पूर्वजांपेक्षा
वेगळे होते ते त्या सर्वोदयी याचकांपेक्षा
ज्यांच्या गांधीवादी बनियानीमध्ये पडून राहत होता
आणि आजही पडून राहतो
विदेशी अनुदानाचा नारा.

भिकाऱ्यांनी भिकेला नवी उंची दिली
जागतिकीकरणाच्या काळात
भिकेला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा दिली
भिकाऱ्यानी क्रांती आणि परिवर्तनाच्या
नव्या व्याख्या रचल्या...
भिकाऱ्याने म्हटलं-'भुकेने तडफडून मरून जाल
जर संपूर्ण भाकर मागाल
आम्ही तुमच्यासाठी मागून आणत राहू
भाकरीचे छोटे-छोटे तुकडे,
तुम्ही ते खात जा
एक दिवस तुमच्या पोटात होईल
एक पूर्ण भाकर
नका करू गोष्टी सारे कारखाने
आणि कोळसा आणि खनिजे आणि
देशाच्या हुकुमतीवर ताबा मिळविण्याच्या,
असे प्रयत्न असफल झालेले आहेत.
आम्ही विचारतो व्याकूळ होऊन,
"शेवटी कुठवर चालेल याप्रकारे"
ते मान उचलून आम्हाला रोखतात,
"आम्ही एक अर्ज लिहित आहोत"
मग ते एक रिपोर्ट लिहितात,
मग चिंतन करतात,
मग दौरा करण्यास अन्य दिशेत
चालू लागतात
आम्ही जाणतो, भिकारी नाहीत ते
अपहरणकर्ते आहेत
परिवर्तनाच्या विचारांचे, स्वप्न आणि आशेचे.
हृदयाच्या उष्म्या-विरोधात सतत सक्रीय
थंडीच्या लाटा आहेत
हे भिकारी.

✎ **मनबहकी लाल**

**मूळ हिंदी कविता:** दायित्वबोध
संपादित अनुवाद. **मूळ अनुवाद** साभार: अज्ञात

साथींनो
'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.
•रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
• अहमदनगर - 9156323976, 9657590491
• पुणे - 8669735643

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापानचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.

**बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल**
**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**
**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |


# पूरसंकट: आसमानी की सुलतानी?

**सुरज**

महाराष्ट्रामध्ये 22 व 23 जुलै 2021 ला झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये गरीब कष्टकरी जनतेचे सर्वाधिक नुकसान झाले. या पुरामुळे राज्यातील सुमारे 251 लोक मरण पावले. आणि 100 पेक्षा अधिक नागरिक बेपत्ता आहेत. यानंतरही ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये राज्याच्या मराठवाडा आणि इतर भागांमध्ये पुराने प्रचंड नुकसान केले आहे. पूर ओसरल्यानंतरही प्रशासनाकडून मदतकार्यात गंभीर दिरंगाई झाली आहे. ही नेहमीची दिरंगाई हेच दाखवते की भांडवली लोकशाही नफ्याची काळजी जनतेपेक्षा जास्तच करते!

पुरांमध्ये बहुसंख्य लोकांची घर उधवस्त झाली. लोकांच्या घरांमध्ये पाणी व चिखल गेल्यामुळे संसारोपयोगी सर्व वस्तूंची नासधूस झाली, दिवसरात्र एक करून साठवलेले अन्नधान्य पाण्यात वाहून गेले, मेहनतीतून एक एक वीट उभा करून आपल्या घराला आकार दिला ती घरं जमीनदोस्त झाली, अनेक लोकांना दुखापती झाल्या, अनेकांचे प्राण ही गेले. त्यामुळे आज लाखो नागरिक रोज उगवणारा नवीन दिवस हा कसा सरेल या चिंतेत जगत आहेत. हाताला काम नसल्यामुळे, खिशात एक कवडीही शिल्लक नसल्यामुळे पोट कसे भरायचे? आयुष्यभर मेहनत करून उभारलेला संसार परत कसा उभा करायचा? असे अनेक प्रश्न त्यांच्यापुढे आ वासून उभे आहेत. आलेल्या पुरामुळे संसर्गजन्य आजारांनी नागरिकांना वेढले आहे. आधीच कोरोना काळात मोदी सरकारच्या ढिसाळपणामुळे गरीब कष्टकरी मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. आणि लगेच ह्या आलेल्या प्रलयामुळे लहान मुलांच्या शाळेची वह्या, पुस्तके हे सगळे पाण्यात मिळाल्यामुळे त्यांना आता शिक्षण घेणेच कठीण झाले आहे. असे असताना देखील मोदी सरकार व ठाकरे सरकारकडून पूरग्रस्तांना कसलीच मदत पोहोचलेली नाही.

पूरग्रस्तांना मदत करण्यात अपयशी ठरलेलं मोदी व ठाकरे सरकार यांच्या "राम"राज्यात गरीब कष्टकरी जनतेची आलेल्या पुरामुळे किती भयंकर अवस्था झाली आहे ते आपल्याला काही आकडेवारींवर नजर टाकली तर लक्षात येईल. नुकत्याच आलेल्या पुरांमुळे राज्यातील कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे 1,020 पेक्षा जास्त गावे पुरामुळे बाधित झालीत. 4.35 लाखाहून अधिक लोकांना आपल घर सोडावं लागलं. 28,700 हून अधिक कोंबड्यांचा मृत्यू झाला आणि सुमारे 300 इतर पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाला. सुमारे 251 लोक मरण पावले आहेत आणि 100 हून अधिक नागरिक हे अजूनही बेपत्ता आहेत. खेड तालुक्यात पोसरे येथील भुस्खलन दुर्घटनेत 17 व्यक्ती मरण पावले. प्राथमिक अंदाज सांगतात की पुरामध्ये 2 लाख हेक्टर पेक्षा जास्त पिकाचे नुकसान झाले आहे. सुमारे 800 पूल पाण्याखाली गेले, ज्यामुळे विविध गावांशी होणारा संपर्क तुटला. जवळपास 700 गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आणि पावसामुळे 9.5 लाख ग्राहकांचा वीज पुरवठा प्रभावित झाला. मुंबईत झालेल्या अतिवृष्टीमुळे झोपडपट्टी, चाळीत राहणारे नागरिक, छोटे दुकानदार, ठेले, पथारी वाले यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. चेंबूर, मुलुंड या ठिकाणी दरड कोसळून 40 पेक्षा जास्त नागरिकांचे बळी गेलेत. हनुमाननगर, पोयसर, दिंडोशी, गोवंडी,



निबारपाडा, विक्रोळी या परिसरात शेकडो घरे जमीनदोस्त झाली. चिपळूण येथे अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीची आकडेवारी अशी: मृत झालेल्या नागरिकांची संख्या : 33, मोठे व लहान दुधाळ जनावरे: 723, ओढकाम करणारे लहान व मोठे:246, कुक्कुटपालन: 4553 कोंबडया, हस्तकला कारागिरांचे हत्यारे/अवजारांचे नुकसान: 24, कच्च्या मालाचे नुकसान: 24, कपडे/भांडी नुकसान, बाधित कुटुंबांची संख्या :13108. मराठवाड्यामध्ये सप्टेंबर मध्ये आलेल्या पुरामुळे 2.6 लाख हेक्टरवर पिकांचे नुकसान झाले आहे आणि यापैकी निम्म्यापेक्षा थोड्याश्याच जास्त पिकांचे पंचनामे केले गेलेत. 4 ऑक्टोबर पर्यंत फक्त 56 टक्के पंचनामे पूर्ण झाले होते. अनेक ठिकाणी तर जमीन खरडून गेली आहे. राज्यभरात 22 लाख हेक्टरवर पिकांचे नुकसान झाले आहे. ही सरकारी आकडेवारी आहे, जी बदलत राहते आणि सर्वांनाच माहित आहे की पंचनामे वेळेवर न होणे नेहमीचे आहे व खरे नुकसान यापैक्षा कैक पटीने जास्तच असते.

महाराष्ट्रामध्ये जलमय झालेल्या अनेक जिल्ह्यांमध्ये दरवर्षी वारंवार पूरपरिस्थिती येऊनही राज्यसरकार व केंद्रसरकारने अजूनही चांगली पूर्वतयारी केलेली दिसली नाही. चिपळूण शहरातील नागरिकांना स्थानिक प्रशासनाने विश्वासात न घेता कोयना धरणातील पाणी सकाळी पहाटे सोडले गेले, ज्यामुळे तेथील नागरिकांवर संकट ओढवले. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार कोयना धरणाच्या भागात 20 ते 23 जुलैपर्यंत जवळपास 300 ते 400 मिली मीटर पावसाची नोंद झाली. त्यामुळे तेथील वीजनिर्मिती वाढवल्याने मोठ्या वेगाने चिपळूणमध्ये पाणी सोडले गेले. पूर्वकल्पना न दिल्या कारणामुळे हा पूर जनतेच्या जीवावर उठला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासनाची रखडलेली कामे जसे की तेथील नदीला संरक्षक भिंत बांधणे, नदीतला गाळ काढणे हे अजूनपर्यंत झालेले नाहीत. चिपळूण शहरात अतिवृष्टी झाली हे जरी मान्य केले तरी पूर जाऊन काही दिवसांचा कालावधी उलटूनही प्रशासनाने वेळीच मदत का केली नाही? याबद्दल स्थानिक प्रशासनाने बीबीसीशी बोलताना सांगत आहे की कोणतीही आपत्ती आल्यानंतर विचार केला जातो की काय करायचं आणि यातच सगळा वेळ जातो. यातून असे लक्षात येतं की शासन-प्रशासनाकडे याबाबतीत काहीच पूर्व नियोजन नाही. ज्या नद्यांना काही ठिकाणी पूर सीमा आखल्या आहेत. त्या सीमांपलिकडे प्रशासनाने नजर देखील टाकलेली नाही. पूर सीमांच्या पलीकडे काहीच घडणार नाही किंवा पूर येणारच नाही या विश्वासावर प्रशासनाची कामे चालतात. वाढत्या नैसर्गिक संकटांच्या काळात तर असे मानणे हलगर्जीपणाचेच ठरेल.

दुसरा असा प्रश्न उभारला जात आहे की वर्षभरात या शहरांनी वारंवार अतिवृष्टी झाल्याचा अनुभव असताना देखील एन.डी.आर.एफ.चे कॅम्प किंवा स्थानिक आपत्ती केंद्र या शहरांमध्ये का उभारण्यात आले नाही? याबद्दल भाजपने ठाकरे सरकारवर टीका केली आहे की तुम्ही एन.डी.आर.एफ.चे कॅम्प उभे केले नाहीत, त्यामुळे लोकांना मदत पोहचू शकली नाही. पण भाजपच्या काळातही हीच स्थिती होती तर भाजप सरकारने एन.डी.आर.एफ.चे कॅम्प का उभारले नाहीत? बीबीसीशी बोलताना राज्यसरकार बोलत आहे की महामार्ग आणि कोकण रेल्वे ठप्प झाल्यामुळे मदत कार्यात मोठा अडथळा निर्माण झाला. हवाई मार्गाने नागरिकांना मोठ्या प्रमाणात मदत पोहोचवली जाऊ शकते, बचावपथके पोहोचवली जाऊ शकतात, पण ती तयारी असेल तर ना? थोडक्यात राज्यसरकार या जबाबदारीतून हात काढून घेण्याचा प्रयत्न करत आहे. खरेतर झालेल्या विध्वंसाला केवळ अतिवृष्टी जबाबदार नसून, गैरव्यवस्थापन करणारे राज्य आणि स्थानिक प्रशासन सुद्धा जबाबदार आहे. अतिवृष्टीचे धोके लक्षात घेता स्थानिक पातळीवर शासनाने प्रभावी नियोजन केले नाही. त्यामुळे पूरपरिस्थितीची तीव्रता आणखी वाढली व गरीब कष्टकरी जनतेचे यामध्ये हाल झाले. आणि परत दुसऱ्या तोंडाने राज्यसरकार बोलत आहे की आमची जबाबदारी अधिक हे आम्ही नाकारत नाही. मग ही जबाबदारी राज्यसरकारने का निभावली नाही? तोंडदाखले बोलून सरकारने फक्त आश्वासन देण्यावर भर दिला आहे. मात्र कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. चिपळूण शहरातील एका महिलेने उद्धव ठाकरेंची भेट चालू असताना मदत मागितली तेव्हा शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी त्या महिलेची खिल्ली उडवत म्हटले की कितीही प्रयत्न केला तरी राज्य सरकार सर्वांना पूर्ण भरपाई देऊ शकत नाही. एकीकडे हे अपमानास्पद आहे आणि दुसरीकडे खोटे! देशामध्ये दरवर्षी 200 लाख कोटी रुपयांची संपत्ती इथले कामगार-कष्टकरी निर्माण करतात तेव्हा कामगार वर्गाची राज्यसत्ता मनात आणेल तर नक्कीच सर्वांचे जीवन पुन्हा मार्गावर आणू शकते; परंतु देशच विकायला काढून भांडवलदारांच्या तुंबड्या भरणारी सरकारं जनतेची खिल्लीच उडवू शकतात!

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे लोकांचे कोट्यवधींचे नुकसान झाल्यानंतर राज्य सरकारने तात्काळ मदत देण्याची घोषणा केली होती. मात्र ती मदत अजूनही मंत्रालयाच्या फायलींपलीकडे सरकलेली नाही. सध्याच्या पुरांचे जाऊच द्या, तौक्ते वादळाची नुकसान भरपाई अजूनही जनतेला मिळालेली नाही. सध्या राज्यसरकारने 11 हजार 500 कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. त्यासोबतच 10,000 रूपये पूरग्रस्तांच्या खात्यात प्रत्यक्ष जमा होतील असे मुख्यमंत्री बोलले. पण नेहमीप्रमाणे बहुसंख्य पूरग्रस्तांना पूर्ण मदत मिळणे दूरच आहे! पूर जाऊन दोन महिने उलटले तरी अजूनही महसूल विभागाला नुकसानीचा ताळमेळ लागलेला नाही. सरकारी खर्च वाचवण्यासाठी महसूल विभाग नेहमीप्रमाणेच टाळाटाळ करत आहे हे दिसून येत आहे. पंचनाम्याच्या कामात तर अति दिरंगाई केली आहे. अजून पण पंचनामे पूर्ण झालेले नाहीत. राज्यसरकारने केलेले आश्वासने व वादे हे हवेतच विरून चालले आहेत.

आपण हे समजले पाहिजे की एकीकडे नैसर्गिक आपत्तींची संख्या आणि तीव्रता वाढणे हे त्या अंदाधुंद चाललेल्या भांडवली विकासाचा परिणाम आहे जो नफ्याच्या लालसेपुढे निसर्गाच्या चक्राला नष्ट करण्याकडे नेत आहे. त्यासोबत जेव्हा आपत्ती येतात तेव्हा याच भांडवली व्यवस्थेचे हित जपणारी सर्व सरकारी यंत्रणा याच उद्दिष्टाने कामाला लावली जाते की मदतीचा दिखावा करत, जनतेवर किमान खर्च केला जावा. यामुळेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अत्यंत तोकड्या रूपात उभी आहे. यामुळेच नुकसान भरपाई जाहीर होतेच ती मामुली; आणि ती सुद्धा अनेकांपर्यंत पोहोचत नाही. म्हणायला तर हे सरकार इतके "शक्तिशाली" आहे की सर्व देशाचा पैसा लोकांच्या खिशातून नोटबंदीद्वारे काढून घेऊ शकते, दरवर्षी उद्योगपतींना लाखो कोटींचा कर माफ करू शकते, देशाची संपत्ती खाजगीकरणातून यांच्या घशात घालू शकते, म्हणायला ते इतके "कर्तबगार" आणि "निर्णयक्षम" आहे की लाखो कोटींची कर्जे बुडवणाऱ्या उद्योगपतींना विदेशात पळू जाऊ देते, रिझर्व बँकेचे पैसे काढून घेऊ शकते आणि बुडत्या बँकांना "वाचवायला" बॅड बँक काढू शकते, 100 लाख कोटींच्या योजना बिल्डर-उद्योगपतींसाठी जाहीर करू शकते; पण नैसर्गिक संकटाच्या वेळी जनतेला नुकसान भरपाई त्वरीत देऊ शकत नाही! यावरून आपण समजले पाहिजे की ज्या व्यवस्थेला आपण "जनतेकडून, जनतेसाठी, जनतेची" अशी समजतो, ती खरंच कोणासाठी आहे.

# महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनची पहिली सर्वसाधारण सभा आणि कामगार आयुक्त कार्यालयासमोर भव्य आंदोलन!

## सर्व बांधकाम कामगारांना एक करण्याचा संकल्प !

✎ बिगुल पत्रकार

पुण्यामध्ये महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली मजूर-नाक्यांवरील बांधकाम कामगार मोठ्या संख्येने आपल्या मागण्यांबद्दल सचेतन होत आहेत आणि संघटित होऊन आपल्या मागण्यांकरिता त्यांनी संघर्ष छेडणे चालू केले आहे. गेल्या काही दिवसात युनियनची पहिली सर्वसाधारण सभा संपन्न झाली आणि कामगारांनी पुणे कामगार आयुक्त कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करून रोजगारासहीत इतर अनेक मागण्यांना तोंड फोडले आहे.

1 ऑगस्ट 2021रोजी महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनची पहिली सर्वसाधारण सभा पुण्यामध्ये कात्रज येथे संपन्न झाली. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित बांधकाम कामगारांनी युनियनच्या घटनेला एकमताने स्विकारले आणि घटनेनुसार युनियनच्या कार्यकारणीची निवड बहुमताने करण्यात आली. यावेळी करोना काळात निधन झालेले नाना पाटोळे आणि सोपान क्षिरसागर या कामगारांना उपस्थित सर्व कामगारांच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी युनियनचे अध्यक्ष म्हणून निवड झालेले कॉ. परमेश्वर जाधव यांनी मांडले की "अर्थव्यवस्थेमधील सर्वाधिक असुरक्षित आणि शोषणकारी कामांमध्ये बांधकाम कामगारांचे काम आहे. प्रत्येक शहरात असंख्य कामगार अड्ड्यांवर आपल्या श्रमशक्तीला विकण्यासाठी, आणि रोज हातावर पोट घेऊन येणारे लाखो बांधकाम कामगार महाराष्ट्रात आहेत. खुलेआम चालणारा हा माणसांच्या श्रमशक्तीच्या खरेदी-विक्रीचा बाजार खरेतर मानवतेला काळीमाच आहे. कामाचे तास, किमान मजुरी, आरोग्य सुविधा, ई.एस.आय., रेशनची सुविधा सोडा, साधे कामगार नाक्यावर शेड आणि पाणीसुद्धा कामगारांना मिळत नाही, पेंशन आणि रोजगाराची हमी तर दूरच आहे. सर्व घरे बांधणारे बांधकाम कामगार स्वत: झोपडपट्ट्यांमध्ये रहायला मजबूर आहेत. भांडवली राजकारणात जनतेला मूर्ख बनवण्याकरिता या कामगारांच्या नोंदण्यांचा दिखावा सरकारने चालवला आहे, परंतु वास्तवामध्ये नोंदण्या करायच्याच नाहीत अशा सूचना कामगार अधिकाऱ्यांना देऊन ठेवल्या आहेत आणि ऑनलाईन पद्धत, कागदी घोड्यांच्या अनावश्यक मागण्यांद्वारे नोंदण्या लटकवण्याचेच धोरण सतत राबवले जाते. यातून दिसून येते की हे सरकार वास्तवामध्ये ठेकेदार-बिल्डरांचे सरकार आहे, कामगारांचे नाही." करोना काळातील संकटाबद्दल मांडत त्यांनी म्हटले की "नाक्यावरील बांधकाम कामगारांसाठी तर प्रत्येक दिवसच दुष्काळ आहे, आणि करोना काळ तर दुष्काळात तेरावा महिना ठरला आहे. करोना काळामध्ये हजारो कामगार बेरोजगार झाले, शेकडो मजुरांची मजुरी बुडवली गेली आणि भुकेने मरण्याची पाळी आली. गेल्या वर्षभरात महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनने संघर्ष करत शेकडो कामगारांना त्यांची मजुरी तर मिळवून दिली आहेच, सोबतच ठेकेदार-बिल्डरांना कामगारांना सन्मानाने वागवण्यास भागही पाडले आहे."

यावेळी युनियनच्या कार्यकारणीने महाराष्ट्रातील लाखो बांधकाम कामगारांना एकजूट करून एकतेची वज्रमूठ बांधण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच जमलेल्या



कामगारांनी रोजगार अधिकाराकरिता, तसेच नोंदणीची जबाबदारी कामगाराची नाही, तर सरकारची आहे असे ठामपणे मांडत कामगार नाक्यावर येऊन सरकारने नोंदणी करावी या मागणीकरिता, जोर लावण्याचा निर्धार व्यक्त केला.

लॉकडाऊन संपलेला असला तरी नाक्यावरील बांधकाम कामगारांच्या हालअपेष्टा आणि बेरोजगारीची स्थिती संपलेली नाही. आठवड्यातील 3 दिवस सुद्धा काम मिळणे दुरापास्त आहे ही स्थिती बनलेली आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी मदतीच्या केलेल्या घोषणा म्हणजे फक्त घोषणांचा पाऊस आहे आणि वास्तवात जमिनीवर जवळपास कोणालाच काहीही मिळालेले नाही. याच असंतोषाला व्यक्त करण्याकरिता **पुण्यातील बांधकाम कामगारांनी शहरातील काही कामगार नाके बंद ठेवून नुकतेच भव्य आंदोलन केले. पुणे शहराच्या इतिहासातील रोजंदारी बांधकाम कामगारांनी केलेला हा पहिलाच संप होता.**

महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनच्या वतीने रोजगाराचा अधिकार आणि कामगारांच्या नोंदणीकरिता 31 ऑगस्ट रोजी पुणे येथे कामगार आयुक्त कार्यालयासमोर भव्य आंदोलन केले गेले. **पुण्यातील अप्पर डेपो, कात्रज, दत्तनगर, गोकुळनगर, कोंढवा येथील मजूर अड्ड्यावरील शेकडो मराठी व हिंदी भाषिक बांधकाम कामगार यावेळी आंदोलनात सहभागी झाले होते. सर्वच जातींच्या, सर्वच धर्मांच्या, हिंदी, मराठी, कन्नड, सर्व भाषिक, स्त्री व पुरुष कामगारांनी जन्मजात अस्मितांच्या भिंती तोडून सहभाग घेतला व कामगारांची वर्गीय एकजूट दाखवून दिली.** "कामगार एकजुटीचा विजय असो", "मजदूर एकता जिंदाबाद', "भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा झालाच पाहिजे", "हर काथ को काम दो, वरना गद्दी छोड दो", "प्रत्येकाची नोंदणी झालीच पाहिजे", "बेरोजगारी भत्ता मिळालाच पाहिजे", "इंकलाब जिंदाबाद", "कामगारांना पेंशन मिळालीच पाहिजे" या घोषणांनी शिवाजीनगरचा परिसर निनादून गेला होता.

यावेळी सूत्रसंचालन करताना युनियनचे सचिव निमिष वाघ यांनी मांडले की "आपण आंदोलन, संप का करतो? लॉकडाऊन, त्यानंतर उडलेला महागाईचा भडका, आणि त्यातच नाक्यावरची बेरोजगारी आपल्याला सर्व बाजूंनी पिचून काढत आहे. आपली परिस्थिती उघडपणे दिसत असताना देखील सरकार आपल्याकडे पूर्ण दुर्लक्ष करत आहे. लॉकडाऊन अगोदरही अत्यंत असुरक्षित स्थितीत, अत्यंत कमी वेतनात आपली पिळवणूक चालूच होती. ही केवळ आजचीच गोष्ट नाही, तर ह्या भांडवली व्यवस्थेची हीच नीती नेहमीच राहिली आहे. सरकार कुठलेही असो, मालकांच्या, बिल्डरांच्या तुंबड्या भरण्यासाठी, त्यांचे साम्राज्य वाढत राहण्यासाठी शक्य ते सर्व केले जाते, परंतु हे सर्व निर्माण करणाऱ्या कामगारांना मात्र वाऱ्यावर सोडून दिले जाते. तेव्हा रोजगार, पेंशन, शिक्षण, नोंदणी, इत्यादी मागण्यांसाठी तर आपण आंदोलन करतोच, पण ह्या मालकधार्जिण्या सरकारला, आणि भांडवली व्यवस्थेला आह्वान देत राहण्यासाठी आपल्याला आंदोलन करावे लागते! आंदोलन करून, संप करून आपण हे दाखवून देतो की आपण देखील माणसे आहोत, आपण देखील जिवंत आहोत! इतकेच नव्हे, तर आपण आता संघटित आहोत, आपल्याला गृहित धरून चालणार नाही, आपला आवाज दाबून आता चालणार नाही! आपण आंदोलन यासाठी करतो की आपल्यासारख्या इतरांना प्रेरणा देऊन, सतत वाढत जाणारी एकजूट निर्माण केली जावी आणि आपल्या सर्व अधिकारांसाठी क्रांतिकारी आंदोलन उभे रहावे."

यावेळी युनियनच्या वतीने साथी पवन इन्सान, अमर घनघाव, किशोर कांबळे यांनी आपले मत व्यक्त केले. सर्व कामगार प्रतिनिधींनी आपला रोष व्यक्त करत मांडले की करोना काळानंतर रोजगाराची परिस्थिती अत्यंत बिकट झालेली आहे, कामगार उपाशी आहेत आणि राज्य-केंद्र सरकार त्याकडे गुन्हेगारी दुर्लक्ष करत आहेत. मोदी आणि ठाकरे ही दोन्ही सरकारे फक्त बिल्डर-भांडवलदारांच्या सेवेत गुंतली आहेत, आणि बांधकाम कामगार व घरकामगारांना वाऱ्यावर सोडले आहे. घरकामगारांच्या नोंदण्या रखडण्यामागे फक्त सरकारी अधिकाऱ्यांची अनास्थाच नाही तर राज्य सरकारचे सुनियोजित धोरण आहे हे वक्त्यांनी यावेळी निदर्शनास आणून दिले. **मोबाईल, इंटरनेट सुविधा नसलेल्या कामगारांना जिला वापरणे शक्य नाही अशी ऑनलाईन प्रक्रिया,** मोबाईलवर ओ.टी.पी., कागदपत्रे स्कॅन करणे आणि अपलोड करणे, अनेकदा साईट बंद असणे आणि यावरताण म्हणजे कामगार वर्गाला त्याच्या शोषक बिल्डर-ठेकेदारांकडून **प्रमाणपत्र आणण्यास भाग पाडणे** अशा अशक्यप्राय प्रक्रियेला फाटा देऊन **कामगार नाक्यांवर येऊन सरकारने नोंदणी केली पाहिजे** अशी मागणी यावेळी केली गेली. वक्त्यांनी मांडले की सरकारला सुद्धा आपण ही जाणीव करून दिलेली आहे की आता हे **किड्या-मुंग्यांसारखे जगणे, सरकारचे आपल्याला वाऱ्यावर सोडणे, आपल्या अधिकारांना पायदळी तुडवणे, आपण खपवून घेणार नाही.** आपल्या हक्कांसाठी, आपल्या मागण्यांसाठी झुंजार संघर्ष करण्यासाठी आपण एकजूट झालो आहोत, होत आहोत. इतकेच नव्हे, तर ज्यांच्यासाठी हे सरकार, ही व्यवस्था चालते, ज्यांच्या पैशावर सत्तेतले सगळे पक्ष आणि प्रतिनिधी उभे आहेत, त्या मालक, बिल्डर, ठेकेदारांनासुद्धा आपल्या ह्या संपातून हा संदेश गेला आहे की नाक्यावरचे बांधकाम कामगार आता एकटे, विखुरलेले, शक्तीहीन नाहीत, ते त्यांच्या पिळवणुकीच्या विरोधात, लुटीच्या विरोधात संघटित होत आहेत, ताकद बनत आहेत. इतकेच नाही, तर नाक्यावरचे कामगार एकत्र येऊ शकतात हा महाराष्ट्र भरातील बांधकाम कामगारांनाही आपण संदेश दिला आहे.

यावेळी पाठिंबा देताना भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षातर्फे कॉ. निखिल एकडे यांनी मांडले की फक्त कामगार वर्गीय पक्षच खऱ्या अर्थाने रोजगाराची हमी देऊ शकतो, तेव्हा कामगारांनी आपले आंदोलन फक्त आर्थिक मुद्यांभोवती केंद्रित न ठेवता कामगार वर्गीय राजकारण समजले पाहिजे. युनियनच्या कलापथकाने कामगार चळवळीची क्रांतिकारी गाणी सादर केली. यावेळी घरकामगार संघर्ष समिती सुद्धा आंदोलनात सहभागी झाली. घरकामगार संघर्ष समितीच्या वतीने अश्विनी खैरनार, कुसुम रोकडे यांनी आपले मत व्यक्त केले.

यावेळी प्रतिनिधी मंडळाला कामगार आयुक्तांनी रखडलेल्या नोंदण्या तातडीने पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले तसेच अपघाताने मृत्यू झालेल्या युनियन सदस्य सोपान क्षिरसागर यांना नुकसान भरपाई सुद्धा देण्याचे आश्वासन दिले. रोजगार अधिकारासंदर्भातील निर्णय हा धोरणात्मक निर्णय आहे, तेव्हा मंत्रीमंडळाकडे त्यासंदर्भातील पत्र पाठवल्याची प्रतही उपलब्ध करून दिली.

यानंतर महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनचे अध्यक्ष परमेश्वर जाधव यांनी मांडले की आज शेकडोंच्या संख्येने एकत्र आलेल्या कामगारांनी आपल्या एकतेच्या जोरावर काही मागण्यांचे लेखी आश्वासन प्राप्त केले आहे. कामगारांमध्ये जात-धर्म-भाषेच्या नावाने फूट पाडणाऱ्या नेत्यांपासून आणि संघटनांपासून सावध राहण्याचा इशारा देत परमेश्वर जाधव यांनी मांडले की एकता हीच कामगारांची खरी शक्ती आहे आणि जात-धर्म-भाषेच्या भेदांविरुद्ध लढूनच कामगार खऱ्या अर्थाने एक होऊ शकतात. आंदोलनाचा समारोप करत त्यांनी मांडले की महाराष्ट्रामध्ये रोजगार अधिकाराच्या आंदोलनाचा बिगुल फुंकला आहे, आणि राज्यभरामध्ये या मागणीच्या भोवती व्यापक एकजूट बनवण्याकरिता यापुढे युनियन प्रयत्नशील राहील आणि येत्या काळात हजारोंच्या संख्येने मुंबईला मोर्चा नेऊन झोपेचे सोंग घेतलेल्या सरकारला जाग आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

# एव्हरग्रांड संकट: चीनमध्ये गृहनिर्माण उद्योग गंभीर संकटात
## भांडवली व्यवस्थेच्या संकटाची अजून एक अभिव्यक्ती!

✎ अभिजित


चीनमधील सर्वाधिक मोठी गृहनिर्माण कंपनी 'एव्हरग्रांड' दिवाळखोरीकडे जाण्याच्या बातम्या आल्या आहेत. तब्बल 300 अब्ज डॉलर्स (म्हणजे जवळपास 21000 अब्ज रुपये) इतकी ती कर्जबाजारी आहे. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात व्याजापोटी भरावयाचे 84 दशलक्ष आणि 47 दशलक्ष डॉलर्सचे हप्ते कंपनी भरू शकणार नाही अशी चिन्हे दिसत होती, परंतु कंपनीने कसेबसे हे तात्कालिक संकट पुढे ढकलले आहे. एव्हरग्रांड ही चीनमधील सर्वाधिक मोठ्या कंपन्यांपैकी एक आहे. बाटलीबंद पाण्यापासून सुरुवात करून, हेल्थ फूड आणि फुटबॉल टीमच्या मालकीसहीत इलेक्ट्रीक गाड्यांच्या निर्मितीतही उतरलेल्या या कंपनीचा मुख्य व्यवसाय गृहनिर्माण हाच आहे. चीनच्या गृहनिर्माण आणि शहरी-ग्रामीण विकास मंत्रालयाने नुकतेच सांगितले आहे की कंपनी कर्ज चुकवण्याच्या स्थितीमध्ये नाही. या बातमीच्या परिणामी 20 सप्टेंबर रोजी जगभरातील शेअर बाजारांमध्ये 1-3टक्के घट आली आहे. या कंपनीच्या शेअर्सचे बाजारमूल्य 85 टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे. असा अंदाज व्यक्त केला जात आहे की चीन मधील इतरही गृहनिर्माण कंपन्या दिवाळखोरीकडे जाऊ शकतात. उदाहरणार्थ, चीनमधील हुरॉंग ही गृहनिर्माण कंपनी 240 अब्ज डॉलर्स इतक्या कर्जाखाली आहे आणि तिची स्थितीही खराब असल्याचे कळते.

एव्हरग्रांडचे 280 शहरांमध्ये 1300 प्रकल्प आहेत. यापैकी 800 प्रकल्प सध्या अपूर्ण आहेत आणि अशा प्रकल्पांमध्ये कंपनीने जवळपास 16 लाख घरे "विकली" आहेत जी अजून बनून तयारच झालेली नाहीत. परिणामी या कंपनीकडे पैसे गुंतवून घरांच्या आशेवर बसलेल्या चीनमध्ये निर्माण झालेल्या मध्यमवर्गाचे धाबे दणाणले आहे. कंपनीने पैसा गोळा करण्यासाठी घरांचे भाव पाडून घरे विकण्याचा प्रयत्न चालवला, परंतु तो सुद्धा फसणारच होता आणि फसला.

एकीकडे एव्हरग्रांडमध्ये गुंतवणूक केलेल्या लोकांना (कंपनीने 'संपत्ती नियोजन निधी' Wealth Management Fund नावाने कर्जरोखे काढले होते, ज्याद्वारे अनेक लोकांनी कंपनीला कर्जाऊ पैसे दिले आहेत) कंपनीला जास्त परताव्याने पैसे परत करायचे आहेत तर दुसरीकडे पैसे देऊन घरे घेऊ इच्छिणाऱ्या लोकांना घरे द्यायची आहेत. कंपनीने 171 चीनी बँकांकडून आणि 121 वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतले आहे आणि या सर्व बँकांनाही संकटाचा फटका बसणार आहे. कंपनी संकटात येऊ लागली तशी या कंपनीने अगदी आपल्या कर्मचाऱ्यांकडेही कर्ज मागितले आणि कंपनीचे मोठे नाव आणि जास्त व्याजदराने परताव्याचे आमिष बघून कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सुद्धा कंपनीला कर्ज दिले! परंतु आता पुरेशी घरे बनली नसल्याने घरे देऊ शकत नाही आणि गुंतवलेला पैसा शिल्लक नाही म्हणून कर्जाऊ रक्कम परत देता येत नाही अशी स्थिती झाली आहे. अशा स्थितीत कंपनीने ज्या लोकांनी गुंतवणूक केली होती, त्यांना पैशांऐवजी घरे देऊ केली आहेत! थोडक्यात अतिप्रचंड पैसा गुंतून पडला आहे; एकीकडे निर्माण झालेली घरे पडून आहेत आणि दुसरीकडे लक्षावधींचे पैसे बुडण्याची स्थिती येऊन पोहोचले आहे! फक्त एव्हरग्रांडच नाही तर इतरही अनेक चिनी गृहनिर्माण कंपन्यांची हीच स्थिती आहे.

### जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम

जगभरातील अनेक भांडवली अर्थतज्ञांचे म्हणणे आहे की जर चीन सरकारने एव्हरग्रांडला "मदत" केली नाही, तर या कंपनीच्या कोसळण्याचा जागतिक बाजारावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. एव्हरग्रांडच्या 300 **अब्ज डॉलर्स कर्जा**पैकी जवळपास 19 अब्ज डॉलर्स **एवढे कर्ज परदेशी बॉंड्सच्या (ऑफशोअर बॉंड्स जे चीनच्या परकीय चलनाच्या रेमिनबी - सी.एन.एच.- मध्ये आहेत)** रूपात आहे. **ब्लॅकरॉक, एच.एस.बी.सी, यू.बी.एस. सारख्या जागतिक फंड व बँकांनी एव्हरग्रांडची कर्ज विकत घेतली आहेत. थोडक्यात एव्हरग्रांडला बसलेला फटका अमेरिका/युरोपातील बँकांनाही बसणार आहे.**




जागतिकीकरणामुळे भांडवली बाजाराच्या एका साखळीत बांधल्या गेलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेला सुद्धा चीनमधील या घरघरीचे चटके जाणवले आहेतच. जगभरात धातू, रसायन आणि सिमेंट उद्योग अशा गृहनिर्माण उद्योगाला पूरक असलेल्या उद्योगांच्या शेअर बाजारातील किमतीमध्ये घसरण लगेच दिसून आली आहे. भारतातही टाटा स्टील, जिंदल स्टील, लक्ष्मी ऑर्गॅनिक्स, टाटा केमिकल्स, सेल, जे.एस.डब्ल्यू स्टील, डी.सी.डब्ल्यु अशा अनेक कंपन्यांच्या शेअरच्या किमती 10 ते 15 टक्के घसरल्या आहेत. भारतात धातूउद्योग कंपन्यांच्या शेअर्सचा निर्देशांक 6 ते 7 टक्के खाली आला आहे.

### 2008 मधील अमेरिकेतील गृहनिर्माण बाजारातील महामंदी

2008 साली अमेरिकेतील गृहनिर्माण बाजारातील चढ्या दरांचा फुगा फुटला होता आणि अमेरिकेसहीत जवळपास संपूर्ण जगाने तीव्र मंदी अनुभवली होती. या मंदीमध्ये अमेरिकेतील 'लेहमन ब्रदर्स' या सर्वाधिक मोठ्या वित्तीय संस्थेसहीत जवळपास सर्वच सर्वाधिक मोठ्या बँका बुडीत निघाल्या, अमेरिकेतील कोट्यवधी नागरिकांची आयुष्यभराची कमाई बुडाली. परंतु अमेरिकन सरकारने (जे अमेरिकन भांडवलदार वर्गाच्या सत्तेचे प्रतिनिधी आहे!) जनतेच्या कराच्या पैशातून तब्बल 2000 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम बँकांमध्ये ओतून अर्थव्यवस्थेला कसेबसे वाचवले. त्यानंतर अजूनही अमेरिकन अर्थव्यवस्था जाग्यावर आलेली नाही.

एव्हरग्रांडचा प्रश्न समोर आल्यानंतर ही चीनची 'लेहमन ब्रदर्स' घटना ठरते की काय असे प्रश्न उपस्थित होत आहेत. एकंदरीत कर्जाच्या आकड्याकडे बघता (लेहमन ब्रदर्स 600 अब्ज डॉलर्सची होती) आणि चीनच्या एकंदरीत अर्थव्यवस्थेची स्थिती पाहता हा झटका तेवढा मोठा नसेल असे दिसत आहे; परंतु परिणाम सर्वत्र जाणवल्याशिवाय नक्कीच राहणार नाहीत. एव्हरग्रांड आणि अमेरिकेतील लेहमन ब्रदर्सचे कोसळणे यात एक गुणात्मक फरकही आहे. लेहमन ब्रदर्स आणि अमेरिकेतील इतर अनेक बँका व वित्तीय संस्थांनी प्रचंड प्रमाणात कर्जाचे वाटप करून ठेवले होते जे परत न आल्यामुळे बँकांचे दिवाळे निघाले. एव्हरग्रांडच्या बाबतीत कंपनी पूर्ण झालेली घरे विकू न शकल्यामुळे आणि प्रकल्प पूर्ण न करू शकल्यामुळे संकटात आली आहे. हा फरक जरी असला तरी या दोन्ही स्थितींमध्ये एक महत्त्वाचे साधर्म्यही आहे आणि ते म्हणजे दोन्ही ठिकाणी मोठमोठ्या बँकांचा प्रचंड पैसा अडकलेला आहे आणि **वित्तीय भांडवलशाहीचे संकट दिसून येते आहे. या दोन्ही संकटांमागे भांडवली अर्थव्यवस्थेचे नफ्याच्या दराचे संकट आहे हे सुद्धा समजणे आवश्यक आहे.**

काही जण या संकटामागे चीनच्या (तथाकथित) 'कम्युनिस्ट' पक्षाची धोरणे शोधत आहेत. वास्तव हे आहे की **लाल झेंड्याच्या आवरणाखाली आणि कम्युनिस्ट लेबल लावून चालणाऱ्या चीनमध्ये मार्क्सवाद आणि समाजवादाचा लवलेशही बाकी नाही.** 1976 पासून डेंग झियाओ-पिंग ने चालू केलेल्या भांडवली विकासाच्या दिशेने आता कळस गाठला आहे आणि **मक्तेदारी भांडवलशाहीचे एक निरंकुश मॉडेल चीनमध्ये काम करत आहे.**

याशिवाय अनेक भांडवली अर्थतज्ञ नेहमीप्रमाणे या संकटाचे कारण वरवर दिसणाऱ्या गोष्टींमध्ये जसे की काही उच्चपदस्थांचे चुकीचे निर्णय, काही मूठभरांचा लोभीपणा, सरकारची चुकीची धोरणे, इत्यादीमध्ये दाखवण्याचा प्रयत्न करतील. परंतु पुढे वर्णन केल्याप्रमाणे एव्हरग्रांडचे संकट हे भांडवली व्यवस्थेच्या नियमांचा परिणाम आहे, कोणा चुकीचे निर्णय घेणाऱ्या उद्योगपतींच्या चुकांचा नाही आणि समाजवादी व्यवस्थेचा (ती तर अस्तित्त्वातच नाही!) तर अजिबातच नाही.

भारतामध्येही आय.एल.ऍंड एफ.एस. या अतिप्रचंड मोठ्या गृहनिर्माण कंपनीचे दिवाळे 2018 मध्ये निघाले होते. त्यानंतर भारत सरकारला या कंपनीचे नियंत्रण ताब्यात घेऊन नवीन नियामक मंडळ बसवावे लागले होते. **भारतातील गृहनिर्माण उद्योगामध्ये असलेली कुंठिततेची (स्टॅग्नेशन) स्थिती कोणालाही दिसू शकते.** भारतातील गृहनिर्माण क्षेत्रामध्ये सुद्धा मालमत्तेचे दर न वाढणे आणि काही प्रमाणात किमती कमी होणे गेले अनेक वर्षे दिसून येते आहे. 2019 मधील एका अभ्यासानुसार भारतात 1.109 कोटी घरे रिकामी पडून आहेत!

प्रश्न आहे की अमेरिका, चीन ते भारतामध्ये गृहनिर्माण क्षेत्रामध्ये निर्माण होत असलेल्या या संकटांचे कारण काय आहे?

### गृहनिर्माण उद्योगातील दिखाऊ तेजी: सट्टेबाजीचा, भांडवली व्यवस्थेचा परिणाम

जमिन मनुष्याने बनवली नाही, पण तिच्यावर खाजगी मालकी स्थापित मात्र झाली आहे. ऐतिहासिकरित्या ही मालकी बळाच्या वापरानेच स्थापित झाली. जमिनीवर जर कोणी काहीच मेहनत केलेली नसेल, तर अशा जमिनीचे मूल्य शून्य असते. परंतु भांडवली बाजारात जेव्हा सर्व काही विकायला निघते तेव्हा जमिनीसारखी नैसर्गिक संपत्ती, जी निर्माण करण्याकरिता मनुष्याने काहीही मेहनत केलेली नाही, ती सुद्धा विकाऊ बनते आणि बाजारातील मागणी पुरवठ्याच्या नियमाने तिचीही किंमत ठरू लागते.

भांडवली अर्थव्यवस्था फक्त नफ्यासाठीच चालते. नफ्याचा चढा दर हे प्रत्येक भांडवलदाराचे उद्दिष्ट असते. स्पर्धेमध्ये काही उद्योग नष्ट होतात, तर टिकणारे सहसा भांडवलाच्या आकाराने मोठेच होत जातात. अतिप्रचंड मोठ्या अशा कंपन्या आणि बँकांचा उदय (आज यापैकी **अनेकांचा व्यवसाय 1,000 अब्ज डॉलर्सच्या वर आहे!) भांडवलाच्या सतत होत जाणाऱ्या केंद्रीकरणाचेच प्रतीक आहेत.** एकीकडे स्पर्धा सतत नवनव्या यांत्रिकीकरणाला, नवनवीन तंत्रज्ञान शोध आणि वापराला भाग पाडते; सोबतच त्यामुळे प्रत्येक टिकणाऱ्या कंपनीच्या एकंदरीत गुंतवणुकीमध्ये यंत्र-तंत्रज्ञान-कच्चामाल यावर होणारी स्थिर गुंतवणूक वाढत जाते आणि मजुरीवरील गुंतवणूक कमी होत जाते. या वाढलेल्या खर्चिक गुंतवणुकीच्याच परिणामी नफ्याचा दर घसरण्याची शक्यता निर्माण होणे. यप्रकारे एकंदरीत अर्थव्यवस्थेत जेव्हा नफ्याचे दर घसरू लागतात तेव्हा मंदीची सुरुवात होते. परतावा कमी आल्यामुळे भांडवलदार वर्ग गुंतवणूक कमी करतो, त्यामुळे रोजगार कमी होतो आणि जनतेची प्रभावी खरेदी क्षमता घसरते. भांडवलाच्या नफ्याच्या घसरत्या दराच्या संकटामुळे अशाप्रकारे मालाच्या

पान 6 वर

# लखीमपूर खेरी हत्याकांडांचा निषेध असो!

पान 1 वरून

तेव्हा त्या अधिकारांना खुंटीवर टांगण्याची सोयही केली आहे. मोदी सत्तेवर आल्यापासून फॅसिस्ट राजवट देशात चालू आहे. फॅसिझमची विचारधाराच मूळात लोकशाही विरोधी आहे हे सांगण्याची गरज नाही. फॅसिझम हा, रूपकार्थाने, भांडवलदार वर्गाच्या हातातील साखळीला बांधलेला तो हिंस्त्र कुत्रा असतो, ज्याला गरज पडेल तेव्हा कामगार वर्गाविरोधात भांडवलदार वर्ग मोकळा सोडू पाहतो. गेले दशकभर भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक वाढीचा घसरता वेग आणि बिकट होत गेलेली आर्थिक संकटाची परिस्थिती यामुळे 2014 च्या निवडणूकीपासून भारतातील भांडवलदार वर्गाने आपली सर्व शक्ती एकमताने फॅसिस्ट विचारांच्या भाजपमागे उभी केली, कारण आर्थिक संकटाच्या काळात जनतेच्या असंतोषाला व त्यातून निर्माण होणाऱ्या आंदोलनांना दाबून टाकण्यासाठी अशाच पक्षांची, भांडवलाच्या 'लोहपुरुषां'ची आवश्यकता असते.

दुसरीकडे हे सुद्धा खरे आहे की धनिक शेतकरी वर्ग हा कामगार वर्गाचा मित्र होऊच शकत नाही. शेतमजुरांच्या शोषणातूनच धनिक शेतकरी वर्गाच्या तुंबड्या भरल्या जातात. सध्या चालले हमीभावासाठीचे शेतकरी आंदोलन हे धनिक शेतकरी वर्ग आणि कॉर्पोरेट कंपन्या यांच्यामधील वर्गीय अंतर्विरोधांचा परिणाम आहे, आणि त्यामुळेच या दोन्ही शोषकांच्या आपसातील आंदोलनामध्ये कामगार वर्गाने कोणाचीही बाजू घेण्याची काहीच आवश्यकता नाही. तीन शेती कायद्यांपैकी काळाबाजाराला परवानगी देणाऱ्या, आणि म्हणूनच कामगार वर्गाच्या विरोधात असलेल्या कायद्याला कामगार वर्गाने आपल्या स्वतंत्र राजकीय मंचावरून विरोध केला पाहिजे, ना की धनिक शेतकऱ्यांच्या.

असे असतानाही लखीमपूर खेरीसारख्या घटनांचा आपण तीव्र निषेध केलाच पाहिजे कारण फॅसिस्ट सत्ता दमन करत असताना लोकशाही-नागरी अधिकारांना जर पायदळी तुडवत असेल, नागरिकांना त्यांचा विरोध करण्याचा, योग्य न्यायालयीन प्रक्रियेचा अधिकार डावलत असेल तर हा फक्त शेतकऱ्यांवरचा हल्ला नसतो तर त्या अधिकारांवर हल्ला असतो जे कामगार वर्गासाठीही अत्यंत आवश्यक आहेत. आज त्यांचे दमन होत असेल तर उद्या कामगारांचे, विद्यार्थ्यांचे, युवकांचे, महिलांचे, दलितांचे सुद्धा दमन केले जाईल! अशा प्रत्येक दमनातून फक्त जनांदोलनांना हानी होत नाही, तर दमनकारी कारवायांनंतर खोट्या बातम्या, अफवा, भ्रामक विश्लेषण आंदोलनांची बदनामी, आणि सतत केल्या जाणाऱ्या अशा दमनकारी कारवायांना "सामान्य" घटना भासवत जाणे इत्यादींद्वारे जनमानसामध्ये लोकशाही अधिकारांची, नागरी अधिकारांची जाणीवही कुंठीत करण्याचे काम राज्यसत्ता करत जाते.

भांडवली लोकशाहीने दिलेल्या, मर्यादित का होईना, अधिकारांच्या चौकटीला जपणे आणि अधिक व्यापक लोकशाही-नागरी अधिकारांसाठी सतत संघर्ष करणे हे कामगारवर्गाचे उत्तरदायित्व आहे कारण भांडवली व्यवस्थेच्या विरोधात आपला संघर्ष तीव्र करण्यासाठी सर्वाधिक उपयुक्त साधनं, अधिकार हीच चौकट पुरवते. कामगार वर्गाचे महान शिक्षक कॉम्रेड लेनिन यांच्या शब्दात सांगायचे तर, "भांडवलशाहीमध्ये कामगारवर्गाकरिता राज्यसत्तेचे सर्वात चांगले रूप म्हणून आम्ही लोकशाही गणराज्याच्या बाजूने आहोत." भारतातील लोकशाही गणतंत्र हे कमजोर लोकशाही अधिकार देणारे असले, तरी लोकशाही गणतंत्र आहेच, आणि निवडणूका, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, कायद्याची प्रक्रिया, इत्यादी लोकशाही-नागरी अधिकार हे कामकरी वर्गांच्याच संघर्षांमुळे मिळालेले आहेत, तेव्हा त्यांच्या रक्षणासाठी आवाज उठवणे हे आपले कर्तव्यच ठरते. हमीभाव हा लोकशाही अधिकार नाही, तर लुटीची परवानगी आहे, त्यामुळे कामगार वर्ग त्याला विरोध करेल; परंतु आंदोलन करणे, न्यायालयीन प्रक्रिया हा लोकशाही अधिकार आहे आणि त्याकरिता कामगार वर्ग नक्कीच विनाशर्त लढेल.

### शेतकरी आंदोलन उभे होण्यामागील वर्गीय अंतर्विरोध

हरित क्रांतीच्या वेळी शेतीमध्ये भांडवली विकास वेगाने व्हावा म्हणून देऊ केलेली हमीभावरूपी अतिरिक्त नफ्याची खाली भारतातील धनिक शेतकरी वर्गाला मजबूत करत गेली. आता शेतीमध्ये भांडवली विकास पूर्णत्वाला पोहोचत असताना या सवलतींचे व्यापक भांडवली व्यवस्थेकरिता काही महत्व राहिलेले नाही, आणि भांडवली झालेले शेतीचे हे रूपच कॉर्पोरेट कंपन्यांना शेतीकडे खेचत आहे. त्यामुळे निश्चितपणे भांडवलदार वर्गाच्या दोन हिश्श्यांचा झगडा येथे निर्माण झाला आहे. धनिक शेतकरी वर्ग हा भांडवलदार वर्गाचाच एक भाग आहे आणि त्याचा कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाशि अंतर्विरोध हा मित्रतापूर्ण आहे. मित्रतापूर्ण ह्या अर्थाने की भांडवली व्यवस्थेच्या चौकटीतच त्याचे निराकरण शक्य आहे. मित्रतापूर्ण अंतर्विरोध जेव्हा तीव्र होतात तेव्हा एका मर्यादेपर्यंत सत्तेचा निर्णायक वाटेकरी वर्ग (कॉर्पोरेट भांडवलदार), दुसऱ्या हिश्श्याचे (धनिक शेतकरी वर्गाचे) दमनही करू शकतो. शेतकरी आंदोलनाचे (अजून तरी मर्यादितच असलेले) दमन होण्याला या आंदोलनाला फॅसिझम विरोधी चरित्र आहे असे दाखवू इच्छिणाऱ्यांपासून मात्र सावध राहिले पाहिजे.

### भारतातील फॅसिझमचे वेगळेपण समजणे आवश्यक आहे

फॅसिझमचा एक सामाजिक आंदोलन आणि राजकीय शक्ती म्हणून उदय होण्यामागे निश्चितपणे भांडवली व्यवस्थेचे आर्थिक-राजकीय संकट आहे. अशावेळी जेव्हा जनांदोलनांना 'नियंत्रित' ठेवण्यासाठी लोकशाही अधिकारांवर घाला घातला जातो, तेव्हा भांडवलदार वर्गाच्या विविध हिश्श्यांचे प्रतिनिधित्व करणारे भांडवली राजकीय पक्षही सरकारी दमनाच्या कचाट्यात येऊच शकतात. ऐतिहासिकरित्या जगाच्या विविध भागांमध्ये नेहमीच (फॅसिझम असो, वा नसो) सत्ताधारी पक्षांनी विरोधकांचे दमन केलेच आहे, फॅसिझमच्या काळामध्ये लोकशाही प्रक्रिया धाब्यावर बसवून हे दमन पुढे जात असते.

फॅसिझम ही फक्त हुकूमशाही नसून, त्यामागे प्रतिक्रियावादी वर्गांचे एक सामाजिक आंदोलनही असते. भारतामध्ये निम्न-भांडवलदार वर्ग हा भाजपचा खंदा समर्थक आहे. धनिक शेतकरी वर्गाचा मोठा हिस्सासुद्धा भाजपचा समर्थक आणि सामाजिक आधार राहिला आहे. हे विसरता कामा नये की मुझफ्फरपूर धार्मिक दंगलींमागे शेतकरी आंदोलनाचे नेते राकेश टिकैतची भुमिका होतीच आणि आत्ताही लखींमपूर खेरीमध्ये मध्यस्थीकरिता भाजपने राकेश टिकैतवरच विश्वास ठेवला आणि आंदोलन "भडकू न देण्याकरिता" टिकैतांनी तो विश्वास सार्थही ठरवला.

हिटलर-मुसोलिनी प्रणीत फॅसिझमच्या विचारधारेने एकीकडे दुसऱ्या महायुद्धामध्ये कोट्यवधींचे जीव घेतले, दुसरीकडे जर्मनी-इटलीमध्ये लोकशाही राजकीय यंत्रणा मोडीत काढून नग्न हुकूमशाही लादली. भारतामध्ये लोकशाही निवडणूकांची यंत्रणा कायम असल्यामुळे अनेकांना अजूनही भारतामध्ये फॅसिझमची राजवट काम करत आहे हे मान्य होत नाही. इथे हे समजणे आवश्यक आहे की इतिहास कधीही जशाच्या तसा पुनरावृत्ती करत नसतो. भारतातील फॅसिझम, जो भाजप-आर.एस.एस.च्या रूपाने भारतातील एतद्देशीय भांडवलदार वर्गाच्या हुकूमशाहीचा ध्वजवाहक आहे, तो लोकशाही यंत्रणेला समाप्त करून नाही, तर सर्व लोकशाही संस्थांना आतून पोखरून काढून, त्यांचे रूप तेच ठेवून परंतु गाभा बदलून काम करत आहे. त्यामुळेच न्यायपालिकेपासून ते निवडणूक आयोगापर्यंत आणि प्रसारमाध्यमांपासून ते तपासयंत्रणांपर्यंत सर्वत्र फॅसिस्ट कॅडरची घुसखोरी आणि त्यामार्फत राज्यसत्तेच्या 'स्थायी' यंत्रणेमध्ये आपले कायमस्वरूपी अस्तित्व तयार करून तो काम करत राहील. हे सर्व भारतीय राज्यघटनेच्या चौकटीमध्येच होत आहे, कारण अत्यंत कमजोर लोकशाही आणि कमजोर मूलभूत अधिकार देणाऱ्या राज्यघटनेमध्येच लोकशाहीला धाब्यावर टांगण्यासाठीच्या सर्व तरतूदी उपलब्ध आहेत.

त्यामुळेच कामगारवर्गाला क्रांतिकारी परिवर्तनाची लढाई जर मजबूत करायची असेल, तर प्रदीर्घ संघर्षानंतर मिळालेल्या लोकशाही-नागरी अधिकारांसाठीचा लढा टिकवणे आणि वाढवणे हे आपले कर्तव्य ठरते. शेतकरी आंदोलनाच्या वर्गीय मागण्यांचे समर्थन न करताही त्यांच्याच नव्हे तर जनतेच्या सर्व हिश्श्यांच्या लोकशाही-नागरी अधिकारांकरिता लढणे हा फॅसिझमच्या काळामध्ये आपला महत्त्वाचा कार्यभार ठरतो.

# एव्हरग्रांड संकट: चीनमध्ये गृहनिर्माण उद्योग गंभीर संकटात

पान 5 वरून

कमी विक्रीचे संकट निर्माण होते. जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये गेली 5 दशके यामुळेच मंदीसदृश्य स्थिती आहे. गृहनिर्माण क्षेत्रामध्ये घरे विकली न जाणे आणि परतावा न मिळणे हे या व्यापक संकटाचीच एक अभिव्यक्ती आहे. या मंदीच्या स्थितीमुळेच शेअर बाजारांसारख्या सट्टेबाजारांमध्ये अतिधनाढ्य (आणि त्यांना भुलून कोट्यवधी मध्यम व निम्न-मध्यमवर्गीय लोक) पैसे लावत आहेत आणि जुगाराचा खेळ खेळत आहेत! तेव्हा, विविध क्षेत्रांमध्ये आणि एकंदरीत अर्थव्यवस्थेमध्ये मंदीची स्थिती हे आता एक कायमस्वरूपी तथ्य बनले आहे.

अशा स्थितीमध्ये खोटी आशा दाखवत, भांडवलदार वर्गाचे एक प्रमुख वर्तमानपत्र इकॉनॉमिक टाईम्स म्हणते की "ठोस शहरीकरण, काही भागांमध्ये केंद्रित न होता विकासाचे विकेंद्रीकरण, शहराचे असे नियोजन जे मागणीनुसार घरांचा पुरवठा वाढवेल - अशा पावलांद्वारे गृहनिर्माणामध्ये फुगवटा टाळणे शक्य आहे". हे सर्व दिवास्वप्न आहे. खोटे बोलल्याशिवाय तर भांडवलदार वर्ग आपल्या व्यवस्थेचे अपयश लपवू शकतच नाही. खरे तर आपसात स्पर्धा करून "नियोजन" करणे, नफ्याचा दर कमी मिळाला तरी चालेल पण विकेंद्रीत विकास करणे हे एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या भांडवलदार वर्गाला कधीही शक्य नाही! तेव्हा गृहनिर्माण असो वा उद्योगांची इतर क्षेत्रे यांमध्ये आर्थिक संकटे येत राहणारच.

यालाच दुसऱ्या अर्थाने पहायचे तर **एकीकडे अतिप्रचंड भांडवलरूपी पैसा आहे, त्यातून घर बांधून लोकांच्या गरजा भागवण्याचीही क्षमता आहे, इतकेच नाही तर कोट्यवधी घरे पडून आहेत; परंतु दुसरीकडे कोट्यवधी बेघर आहे आणि झोपडपट्ट्यांमध्ये राहतात** कारण की भांडवली व्यवस्थेचे नफ्याचे उद्दिष्ट लोकांच्या गरजांकरिता घरे बांधत नाही तर नफ्याच्या माध्यमातून भांडवलाच्या वाढीसाठी बांधते; आणि नफ्याचा दर घसरू लागला की भांडवली व्यवस्थेच्या नियमाने एकीकडे घरे रिकामी राहतात आणि दुसरीकडे लोक बेघर! 2018 मधील एका अभ्यासानुसार देशभरात 1.1 कोटी घरे रिकामी आहेत. यापैकी जवळपास 20 लाख घरे महाराष्ट्रात आहेत, तर जवळपास 10 लाख घरे गुजरातमध्ये आहेत. एकट्या पुणे शहरातच 2 लाखांपेक्षा जास्त घरे पडून आहेत, तर गुरुग्राम (गुडगाव) मध्ये 2.5 लाख घरे रिकामी आहेत. 2011 मधील दुसऱ्या एका अंदाजानुसार तर देशभरामध्ये 2.5 कोटी घरे पडून होती आणि यापैकी 95 टक्के घरे उत्तम स्थितीत होती! असे असले तरी बेघर, झोपडपट्टीवासीय लोकांना (ज्यांनी स्वत: ही घरे बांधली) त्यांना ती मिळू शकत नाही! हे आहे भांडवली व्यवस्थेचे खरे रूप!

सर्व रिकामे घरे सरकारने जप्त करून बेघरांना आणि झोपडपट्टीवासीयांना रहायला दिली पाहिजेत हाच या कृत्रिम 'समस्ये'वरचा उपाय आहे. या उपायाने भांडवलदारांना आणि त्यांच्या धंद्याला वाचवले जाणार नाही तर संपत्तीचे खरे मालक असलेल्या कामगार-कष्टकऱ्यांना त्यांनीच निर्मित केलेल्या संपत्तीवरचा खरा अधिकार प्राप्त होईल! एव्हरग्रांडचे संकट जागतिक संकटात लगेचच बदलेल याची चिन्हे सध्या कमी आहेत परंतु महामंदीचे सावट आता एक कायमस्वरूपी सावट बनले आहे आणि भांडवली व्यवस्थेचा नाशच हे संकट संपवू शकतो.

# प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लिग कडून कामगार क्लिनिकचे आयोजन

✎ डॉ. नेहा

प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीग द्वारे कामगार क्लिनिकच्या उपक्रमाचे सत्र पुढे चालू ठेवत ऑगस्ट महिन्यात अहमदनगर आणि पुणे या दोन ठिकाणी मोफत आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीग हि एक न्यायप्रिय डॉक्टरांची संघटना आहे. आरोग्यव्यवस्थेचे खाजगीकरण झालेल्या आजच्या काळात आरोग्य व्यवस्था हि सर्वसामान्य जनतेला, कामगार कष्टकऱ्यांना परवडणारी नाही. आजच्या नफ्याच्या व्यवस्थेत केवळ मूठभर श्रीमंत लोकच चांगले उपचार घेऊ शकतात. सर्वांना समान, मोफत, दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाली पाहिजे, आरोग्याचा अधिकार हा सर्वांचा मूलभूत अधिकार झाला पाहिजे या उद्दिष्टानेच प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीग विविध भागातील वस्त्यांमध्ये, सामान्य जनतेमध्ये कामगार-क्लिनिक लावत असून सोबतच आरोग्य हक्कांबाबत व आरोग्याबाबत जनजागृतीचे काम पूर्णत: लोकसहभागातून आणि लोकसहयोगातूनच करत असते.

दिनांक 5 ऑगस्ट 2021 रोजी अहमदनगर येथे अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मदिवसा निमित्त प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीग व भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षातर्फे अण्णा भाऊ साठे नगर येथे मोफत आरोग्य शिबीर लावण्यात आले होते. शिबीराच्या सुरुवातीला भारताचा क्रांतिकारी पक्षाचे कार्यकर्ते अविनाश म्हणाले की, “कोरोनाच्या काळात कामगार वर्गावर आर्थिक तसेच आरोग्याचे संकटही मोठ्या प्रमाणावर कोसळले आहे. महागड्या आरोग्य व्यवस्थेमुळे कामगार वर्गाला कोरोनाच्या साथीत सुध्दा योग्य उपचार घेता आले नाहीत. प्रगतीशील डॉक्टरांनी अशा परिस्थितीत पुढे येऊन कामगार-कष्टकऱ्यांच्या दारापर्यंत आरोग्य सुविधा घेऊन जाणे अत्यंत गरजेचे आहे.” प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीग कडून डॉ. जयवर्धन यांनी प्रतिपादन केले की कॉर्पोरेट हॉस्पिटलद्वारे व मोठ्या फार्मा कंपन्यांद्वारे होत असलेली जनतेची लूट थांबली पाहिजे व आरोग्यसेवेचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे. त्यानंतर रुग्ण तपासणीला सुरुवात केली, शिबीरामध्ये आलेल्या रुग्णांचे विविध आजारांचे निदान करून औषधोपचार करण्यात आला, त्यासोबत डॉ नेहा यांनी रक्तशर्करा तपासणे, जखमेच्या जागी मलमपट्टी करण्याचे, व औषधी वितरणाचे काम केले. जवळपास 100-120 कामगारांनी शिबीराचा लाभ घेतला. कामगार कष्टकऱ्यांना प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीगतर्फे आर्थिक सहयोगासाठीचे आवाहन सुद्धा करण्यात आले.







दिनांक 24 ऑगस्ट 2021 रोजी शहीद राजगुरू यांच्या जन्मदिवसा निमित्त पुण्यातील कात्रज भागातील संतोष नगर येथे, महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन सोबत प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीगने दुसऱ्या शिबीराचे आयोजन केले होते. प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीग कडून डॉ जयवर्धन व डॉ नेहा यांनी रुग्णांचे वेगवेगळ्या आजारांचे निदान करून औषधोपचार केला. डॉ अर्चना यांनी औषधी वितरणाचे काम केले व सोबतच आरोग्याबद्दलची योग्य माहिती दिली. शिबीरामध्ये मोठ्या संख्येने बांधकाम कामगार रुग्ण सहभागी झाले होते. शिबीरामध्ये आलेले बहुतांशी रुग्ण हे बांधकाम क्षेत्रात काम करत असल्यामुळे अनेकांना सिमेंट कालविण्याच्या कामामुळे त्वचेचे आजार, सिमेंटमुळे झालेली ॲलर्जी , अंगावरील त्वचेचा कोरडेपणा व खाज, त्यासोबतच कामाच्या ठिकाणी सतत विटा , रेती, पोते उचलण्याचे काम असल्यामुळे हाता पायाला झालेल्या जखमा व जखमांमध्ये झालेले इन्फेक्शन इ. आजार डॉक्टरांच्या निदर्शनास आले होते. इलाजापर्यंत पोहोच नसल्यामुळे अनेक कामगार अशा जखमा अंगावरच काढतात आणि परिणामी आपल्या आरोग्याची किंमत देतात हे दिसून येत होते. कोट्यवधींच्या संख्येने बांधकामात लागलेल्या या कामगारांपर्यंत स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतरही प्राथमिक आरोग्य सुविधाही पोहोचलेल्या नाहीत हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे.

या अनुभवांमधूनही दिसून येते आहे की कामगार कष्टकऱ्यांना आज उत्तम आरोग्य सुविधेची गरज तर आहेच, सोबतच आरोग्य अधिकारा विषयी राजकीय जागृतीची गरज असून अशाप्रकारच्या आरोग्य शिबिराचा उपक्रम यापुढेही चालू ठेवण्याचा निर्धार ‘प्रोग्रेसिव्ह डॉक्टर्स लीग’ने केला.

# नॅशनल मॉनेटायझेशन पाईपलाइन : जनतेची संपत्ती भांडवलदारांना सुपूर्द करण्याचा आणखी एक उपक्रम

पान 1 वरून

पाईपलाइन उपक्रमामध्ये 2022 ते 2025 या चार वर्षात रस्ते,रेल्वे, ऊर्जा , तेल आणि नैसर्गिक वायू पाईपलाईन, टेलिकॉम अंतर्गत येणारे ब्राउनफिल्ड प्रकल्प भांडवलदारांना भाडेतत्त्वावर देण्यात येतील.हे प्रकल्प सरकार भांडवलरांसोबत भागिदारीने चालवू शकते किंवा नफ्याचा वाटा घेऊ शकते किंवा एकरकमी किंमत घेऊन उद्योगांना प्रकल्प सुपूर्द करू शकते. यात रेल्वे आणि ऊर्जा याचा 66% वाटा आहे. यातून 6 लाख कोटी रुपये उभे राहतील आणि ते जनतेच्या भल्यासाठी वापरले जातील असा सरकारचा दावा आहे. हे दोन्ही दावे धादांत खोटे आहेत. भांडवलदारांचा एकमात्र उद्देश नफा कमावणे असतो, ना की समाजसेवा करणे. त्यामुळे सरकार जितकी रक्कम मिळणार आहे असे सांगत आहे त्यापेक्षा खूप जास्त किमतीची साधनसंपत्ती उद्योगपतींच्या हवाले करत आहे. दुसरे म्हणजे जे मोदी सरकार सत्तेत आल्यापासून सतत जनविरोधी कायदे आणण्यात, जनतेच्या आंदोलनांचे दमन करण्यात, केंद्र सरकारच्या बजेटमध्ये लोक-कल्याणकारी योजनांवरील खर्च कमी करण्यात, उद्योगपतींना सवलती-कर्जमाफी-करमाफी देण्यातच गेली 7 वर्षे गुंतलेले आहे, ते या मॉनेटायझेशन मधून येणारी कमाई कशासाठी वापरणार ते वेगळे सांगायला नको. खूप दूर जायला नको, करोना काळात सुद्धा याच धोरणांचा प्रत्यय आपल्याला आला आहे. एकीकडे उद्योगपतींना या काळात लाखो कोटींचे पॅकेज दिले गेले, आणि दुसरीकडे कामगार-कष्टकऱ्यांना राशनही न पुरवता लॉकडाऊनमध्ये उपाशी मरायला सोडले. सरकारने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला कायमस्वरूपी मजबूत करण्यासाठी, तसेच तातडीने खर्चच न केल्यामुळे आपल्याच कितीतरी कामगार बंधू-भगिनींना ऑक्सिजन, बेडच्या अभावामुळे जीव गमवावा लागला आहे.

दुसरे म्हणजे या सरकारी प्रकल्पात असलेल्या कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न आणि कामाच्या सुरक्षिततेचा प्रश्न. खाजगीउद्योगांचे नफा कमविणे हे एकच उद्दिष्ट असल्याने अनेक लोक बेरोजगार होतील आणि जे कामावर राहतील त्यांचे कंत्राटीकरण करण्यात येईल. म्हणजे अनेक कुटुंब रस्त्यावर येतील. गेल्या काही वर्षात बेरोजगारी नवे नवे विक्रम गाठत असताना अशी योजना आणणे म्हणजे बेरोजगारीच्या आगीत तेल ओतणेच आहे.

### आताच चलनीकरणाची गरज का निर्माण झाली ?

जागतिक अर्थव्यवस्थेत 2008 पासून जी मंदी आली होती तिची झळ भारताला सुद्धा बसली. भांडवशाहीच्या अराजकतावादी उत्पादन पद्धतीमुळे असे संकट नित्याचेच असते. भांडवलदारांना फक्त वाढत्या नफ्याची हाव असते, परंतु भांडवली बाजाराच्या स्पर्धेत प्रचंड यांत्रिकीकरण करताना नफ्याचा दर मात्र घसरत जातो आणि मंदीच्या शक्यता कायम राहतातच. म्हणूनच सतत मंदी येतच राहते. हे कमी म्हणून की काय, मोदी सरकारच्या नोटबंदीसारख्या तुघलकी कृतीने बाजाराची अर्थव्यवस्था अजूनच बसली आणि सकल राष्ट्रीय उत्पन्न(जी. डी. पी) चा दर रसातळाला गेला. यामुळेच जानेवारी 2020 मध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्नचा दराने 42 वर्षातील ऐतिहासिक निच्चांक गाठला. या सर्व गोष्टींमुळे भांडवलदार वर्गाचे नफ्याचे संकट तीव्र झाले आहे. त्यामुळे याच्यासंदर्भातच चलनीकरणाचा उपक्रम समजून घेतला पाहिजे. चलनीकरणाच्या नावाने चाललेल्या या खाजगीकरणातून नवीन रोजगार निर्माण होतील, पायाभूत सुविधांचा विकास होईल असे कारण दिले जात असले तरी खरे कारण आर्थिक मंदी, नफ्याचा घसरता दर हीच आहेत.

प्रधानमंत्री मोदी स्वतःच सांगतात की सरकारने कोणतेही उद्योग स्वतः चालवले नाही पाहिजेत. यामधे तोट्यात असलेल्या एअर इंडियाचे उदाहरण दिले जाते पण मग भारत अर्थ मूव्हर्स लिमिटेड (बी.एम. ई.एल.) हा संरक्षण क्षेत्रातील उपक्रम असो किंवा एल.आई.सी. सारख्या ज्या सरकारी कंपन्या नफ्यात चालल्या आहेत त्यांना विक्रीस काढण्याचे कारण काय?

त्यामुळे एकीकडे “मैं देश को बिकने नाही दुंगा” म्हणायचे आणि दुसरीकडे जनतेची संपत्ती भांडवलदारांच्या हाती सोपवायचे हीच मोदी सरकारची खरी ओळख आहे! या सरकारचे सर्व ‘जुमले’ आता जनता योग्य प्रकारे ओळखू लागली आहे! चलनीकरण सुद्धा याच जुमल्यांपैकी एक आहे! खाजगीकरणाचे धोरण एकजुटीने, संघर्षाने हाणून पाडत, त्या उलट सर्व उत्पादन साधनांवर, कारखान्यांवर त्यांना निर्माण करणाऱ्या कामगार वर्गाची सामुहिक मालकी स्थापित करण्याच्या क्रांतिकारी कार्यक्रमाला आपण पुढे नेले पाहिजे.

# पेगासस: दमनाचे, जनतेवर पाळत ठेवण्याचे नवे हत्यार

✎ सुस्मित

जगभरातील 17 वर्तमानपत्रसंस्थांनी केलेल्या शोधात असे आढळून आले की जगभरातील अनेक सरकारांनी पेगासस या स्पायवेअरचा (हेरेगिरी सॉफ्टवेअरचा) वापर पत्रकार, सामाजिक-राजकीय कार्यकर्तेच नाही तर अगदी न्यायाधीश, संविधानिक पदांवरील व्यक्ती, माजी पोलिस अधिकारी, राजकीय नेते आणि विरोधकांवर पाळत ठेवण्यासाठी केला आहे. हे स्पायवेअर फोनमध्ये टाकण्यात आल्याची शक्यता असलेल्यांची एक यादी सध्या लीक झाली आहे. 50,000 च्यावर नावे असलेल्या या उघडकीस आलेल्या यादीत जवळपास 300 भारतीयांचे नाव सुद्धा आली आहेत. यामध्ये देशातील अनेक पत्रकार, सामाजिक-राजकीय कार्यकर्त्यांपासून ते खुद्द सरकारमधील दोन मंत्री, निवडणूक आयोगाचे सदस्य, उद्योगपती सुद्धा सामील आहेत. जगातील अनेक भांडवली सरकारं पेगासस सारख्या सॉफ्टवेअरचा वापर करताना मुख्यत्वे दहशतवाद आणि देशाच्या सुरक्षिततेचे कारण देत असतात, पण अशा तंत्रज्ञानांचा वापर त्या सर्वांवर नजर ठेवण्याकरिता केला जातो जे सत्तेमध्ये बसलेल्यांना गैरसोयीचे असतात हे उघड आहे.

### स्पायवेअर म्हणजे काय?

स्पायवेअर हे एका अशा प्रकारचे सॉफ्टवेअर आहे जे व्यक्तीच्या नकळत तिच्या मोबाईल किंवा इतर डिजिटल उपकरणांमध्ये शिरते आणि उपकरणांमधली सगळी माहिती चोरून हल्लेखोराला पाठवते. तुलनाच करायची झाल्यास, जसा माणसावर कोविड -19 हल्ला करतं त्याचप्रमाणे डिजिटल उपकरणांवर स्पायवेअर हल्ला करतं, पण स्पायवेअर तुमच्या मोबाईल, लॅपटॉप इत्यादी वरील माहिती सुद्धा चोरून ऑनलाईन हल्लेखोराला पाठवू शकते. यामध्ये तुमचे सर्व खाजगी संभाषण, सामाजिक-राजकीय संभाषण, आर्थिक व्यवहारांची माहिती, इत्यादी सर्व चोरले जाऊ शकते.


### पेगासस काय आहे ?

पेगासस हे एन.एस.ओ नावाच्या इस्राएली कंपनीने तयार केलेले स्पायवेअर आहे. या स्पायवेअरद्वारे कोणत्याही मोबाईलला लक्ष्य केले जाऊ शकते आणि वापरकर्त्याची सगळी माहिती चोरली जाऊ शकते: जसे फोन नंबर, फोटो, मेसेज, ऍप, इंटरनेट वापराचा इतिहास, स्क्रीनवर काय चालू आहे, इत्यादी; इतकेच नव्हे तर मोबाईलचा मायक्रोफोन आणि कॅमेरा सुद्धा सुरु केला जाऊ शकतो आणि तुम्ही काय बोलत आहात वा काय करत आहात ते सुद्धा हल्लेखोराला माहित होते.

साधारणपणे इतर एखादे स्पायवेअर मोबाईलमध्ये शिरण्यासाठी वापरकर्त्याला फसवून काहीतरी करवण्याचा प्रयत्न केला जातो, उदाहरणार्थ एस.एम.एस किंवा ई-मेल मधल्या लिंक वर क्लिक करावे लागते. पण पेगासस इतके आधुनिक आहे की ज्याला झीरो-क्लिक-अटॅक म्हटले जाते तो होऊ शकतो; म्हणजे वापरकर्त्याने काहीच करायची गरज नाही, तरीही पेगासस फक्त हल्लेखोराच्या कारवाईने तुमच्या मोबाईलमध्ये टाकले जाऊ शकते.

### पेगासस फक्त सरकारंच वापरू शकतात!

एन.एस.ओ. ग्रुप चा दावा आहे की त्यांचे 60 देशात 40 ग्राहक आहेत आणि इस्राएली कायद्यानुसार फक्त अधिकृत सरकारी संस्थानाच ते पेगासस विकू शकतात. त्यामुळे




जरी मोदी सरकाराने कितीही नाकारले तरी भारतीय नागरिकांवर पाळत ठेवण्यासाठी पेगाससचा वापर कोणत्यातरी सरकारी संस्थेमार्फतच केला गेला असणार आहे हे उघड आहे .पेगाससद्वारे हेरगिरी उघडकीस येण्याचे हे काही पहिले प्रकरण नाही. 2019 मध्ये सुद्धा भीमा कोरेगाव प्रकरणात खोट्या केसेस टाकून अडकवलेल्या कार्यकर्त्यांवर पाळत ठेवण्यासाठी पेगाससचा वापर करण्यात आला, हे समोर आले होते. यावेळी मोठे बिंग फुटले आहे आणि सत्ताधारी वर्गाचे भाग असलेले किंवा त्याच्याशी जवळीक ठेवणाऱ्या अनेकांची नावे समोर आली आहेत म्हणून या मुद्द्याला तुलनेने जास्त प्रसिद्धी मिळाली आहे.

### नागरिकांवर पाळत: नवीन नाही !

सरकारद्वारे नागरिकांवर पाळत ठेवले जाणे नवीन तर नाहीच; उलट एक नियमित बाब आहे. **जगभरातील भांडवली सरकारांना जनतेची नेहमीच भिती वाटत आली आहे. त्यामुळेच सामाजिक-राजकीय कार्यकर्त्यांवर सर्व हालचालींवर नजर तर ठेवलीच जात आली आहे,** याउप्पर शक्य असेल तेथे सर्व नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारांवर पाळत ठेवण्याचे कामही केले जाते. यामध्ये कायदेशीर आणि बेकायदेशीर अशा दोन्ही मार्गांचा वापर विविध सरकारं करत आली आहेत.

अमेरिकेतील कुप्रसिध्द वाटरगेट घोटाळ्यामध्ये राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी विरोधकांचे बेकायदेशीरपणे फोन टॅप करण्याचा 1972-73 मधील घोटाळा तर सर्वज्ञात आहे. 1990 च्या दशकामध्ये अमेरिकन सरकारचा इकेलॉन नावाचा गुप्त कार्यक्रम इंटरनेटवरील 90 टक्के संदेशवहन गोळा करण्याच्या स्थितीमध्ये होता. 2001 मध्ये ब्रिटीश सरकारने सर्व नागरिकांच्या फोन संवादावर पाळत ठेवणे चालू केले होते. 2006 मध्ये अमेरिकन सरकारने ए.टी. अँड टी, व्हेरीझॉन सारख्या टेलिफोन कंपन्यांच्या मदतीने नागरिकांचे कोट्यवधी टेलिफोन संदेश गोळा करून एकत्र केल्याचे प्रकरण उघडकीस आले होते. 2011 मध्ये विकीलिक्स या सरकारांची बेकायदेशीर कामे आणि हेरगिरी घोटाळे उघडकीस आणणाऱ्या वेबसाईटवर जाहीर केले गेले की एखाद्या देशातून जाणारे इंटरनेट संदेशवहन, टेलिफोन कॉल्स गोळा करणे शक्य झाले आहे. एकमेकांसोबत नागरिकांची खाजगी माहिती आदानप्रदानासाठी जगभरातील अनेक सरकारांमध्ये आपापसात करार सुद्धा आहेत.

2012 मध्ये एडवर्ड स्नोडेन या अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेत काम करणाऱ्या विश्लेषकाने अमेरिकी सरकारचा करोडो डॉलर्स खर्च करून उभा केलेला प्रिझ्म (PRISM) प्रकल्प उघडकीस आणला. यात अमेरिकेचे सरकार फक्त अमेरिकेच्या नवे तर जगातील इतर नागरिकांवर पाळत ठेवण्यासाठी याचा वापर करत होते. अमेरिका, ब्रिटन, ऑस्टेलियन सरकारच्या संयुक्त प्रयत्नातून चालत असलेल्या प्रिझ्म या अतिप्रचंड मोठ्या प्रकल्पाद्वारे गूगल, फेसबुक, मायक्रोसॉफ्ट, ॲपल सारख्या कंपन्यांसोबत मिळून अब्जावधी नागरिकांच्या खाजगी माहितीवर पाळत ठेवली जात आहे.

भारतात तर माहिती तंत्रज्ञान कायदा 2008 द्वारे सरकारला टेलिफोन संदेशवहनावर पाळत ठेवण्याचा अधिकारच प्रदान केला गेला आणि जवळपास 11 सरकारी संस्थांना हा अधिकार दिलाही गेला आहे. डी.आर. डी.ओ. सोबत मिळून विकसित केल्या गेलेल्या ‘नेत्रा ‘ (NETRA) या प्रकल्पामार्फत जी-मेल, स्काईप सारख्या संवादांवर सुद्धा नजर ठेवली जात आहे. भारत सरकारच्या नॅटग्रिड प्रकल्पामार्फत एखाद्या व्यक्तीच्या कर, बँक खाते, क्रेडीट/डेबिट कार्ड, रेल्वे-विमान प्रवास, परदेश प्रवास अशा अनेक माहितींना एकत्र जोडून नजर ठेवणे शक्य आहे. संसदेत नितीन गडकरी यांनी केलेल्या विधानावरून तर आता हे सुद्धा समोर आले आहे की मोटारकार करिता सक्तीच्या केलेल्या फ़ास्टॅग द्वारे सुद्धा सरकार नागरिकांवर पाळत ठेवू पाहत आहे. आधार सोबत पॅन कार्ड, बँक माहिती, मोबाईल फोन, सरकारी सुविधा, ऑनलाईन खाती, इत्यादी प्रत्येक गोष्ट लिंक करून भारत सरकार एक अतिप्रचंड मोठे नागरिकांवर हेरगिरीचे जाळे निर्माण करत आहे.

### भारतात निजतेचा (प्रायव्हसी) अधिकार

सरकारने नागरिकांच्या खाजगी आयुष्यात डोकावण्याबाबतच्या चिंतांमधून निजतेच्या अधिकाराबद्दल भारतात दीर्घकाळापासून आवाज उठवला जात होता. यासंदर्भात 2017 मध्ये के.पुट्टस्वामी केस मध्ये सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून जाहीर केला. या अधिकाराच्या भंगाला व्याख्यायित करण्यासाठी 3 अटी सुद्धा घालून दिल्या. त्या म्हणजे सरकारला कायद्याच्या आधारेच निर्णय घेऊन व्यक्तींची खाजगी माहिती गोळा करता येईल, सरकारचे काही निश्चित उद्दिष्ट साध्य होत असेल तर आणि सरकारची कृती ही सर्वात कमी अनाहूत असावी. तरीही यानंतर मोदी सरकारच्या कृतीमध्ये फरक पडला नाही. डिसेंबर 2018 मध्ये गृह खात्याने 10 केंद्रीय यंत्रणांना देशातल्या कुठल्याही संगणकातून तयार झालेल्या , प्रसारित झालेल्या किंवा साठवलेल्या माहितीवर पाळत ठेवण्याची, डिक्रिप्ट ठेवण्याची परवानगी दिली. जुलै 2018 मध्ये माहिती व प्रसारण मंत्रालयाने सामाजिक माध्यमांवर जसे फेसबुक, ट्विटर, ई-मेल यांवर पळत ठेवण्यासाठी “सोशल मीडिया कम्युनिकेशन हब “ तयार करण्याचे टेंडर काढले होते. पण सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर ते मागे घ्यावे लागले. मोदी सरकारबद्दल अशी अनेक उदाहरणे देता येतील.

### भांडवलशाही आणि लोकशाही

यासाठी आपण समजले पाहिजे की भांडवलशाहीत जेव्हा आर्थिक संकट तीव्र होते तेव्हा लोकशाहीचा सगळा मुलामा निघून जातो आणि व्यवस्थेचे नागडं रूप दिसू लागते. भारतात सुद्धा गेल्या काही वर्षात घेतलेले अनेक निर्णय जसे नोटबंदी, अनियोजित लॉकडाऊन, वाढते खाजगीकीकरण, कामगारांविरुद्धचे कायदे आणि वाढती महागाई, बेरोजगारी यांच्याविरोधात जनतेमध्ये प्रचंड राग आहे. त्यामुळेच मोठ्या भांडवलदारासाठी काम करणाऱ्या फाशीवादी सत्ताधाऱ्यांना कायमच जनतेची भिती वाटत राहते. त्यासाठी फक्त जनतेचवरच नव्हे तर सत्तेतल्या मंत्र्यांवरसुद्धा पाळत ठेवावी लागते.

लेनिनने म्हटल्याप्रमाणे भांडवलशाहीत लोकशाही ही एका छोट्या श्रीमंत अल्पसंख्यांकांसाठीच असते. त्यामुळे जोपर्यंत नफ्यावर आधारित आणि जनतेच्या शोषणावर चालणारी व्यवस्था आहे तोपर्यंत जनतेविरुद्ध या ना त्या प्रकारे हल्ले चालूच राहतील.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प सहावे)

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरूंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.


पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ‘कामगार बिगुल’ च्या मार्च 2021 अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरूवात केली आहे. ‘मजदूर बिगुल’ मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू.

**या साखळीतील पहिल्या काही पुष्पांमध्ये आपण पॅरिस कम्युनच्या पार्श्वभूमीमध्ये जाणून घेतले की कामगारांनी कशाप्रकारे भांडवलाच्या सत्तेविरोधात लढण्याची सुरूवात केली आणि कशाप्रकारे चार्टीस्ट आंदोलन आणि 1848 च्या क्रांत्यांमधून जात कामगार वर्गाची चेतना आणि संघटितपणा वाढत गेला. आपण कामगारांच्या मुक्तीच्या वैज्ञानिक विचारधारेचा विकास आणि कामगारांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेबद्दल (इंटरनॅशनलबद्दल) जाणले. गेल्या अंकात आपण पाहिले की कम्युनची स्थापना कशाप्रकारे झाली आणि तिच्या रक्षणाकरिता कामगार वर्गीय जनता कशाप्रकारे शौर्याने लढली. यावेळी आपण पाहूयात की कम्युनने खऱ्या लोकशाहीच्या नियमांना इतिहासात पहिल्यांदा व्यवहारात कसे लागू केले आणि हे दाखवले की "जनतेची सत्ता" खरोखर काय असते.**

— संपादक मंडळ

# पॅरिस कम्युन : सर्वहारा अधिनायकत्त्वाचा पहिला प्रयोग



कम्युनजवळ वेळेची कमतरता होती. तिला आपल्या आजू-बाजूला पहायला आणि आपले कार्यक्रम पूर्ण करण्याच्या तयारीला सवड मिळाली नाही. ते कामाला लागले पण नव्हते की व्हर्साय येथे जमलेल्या, संपूर्ण बुर्झ्वा वर्गाद्वारे समर्थक सरकारने पॅरिसविरूध्द युद्धाच्या कारवाईला सुरवात केली. कम्युनला सर्वप्रथम आपल्या स्वरक्षणाबद्दल विचार करावा लागला. तिला आपल्या शेवटच्या दिवसापर्यंत, 21-28 मे पर्यंत, कुठल्याही गोष्टीचा गांभीर्याने विचार करायची संधी मिळालीच नाही. परंतु कम्युनचे सदस्य मिळालेल्या वेळेचा पूर्ण फायदा घेवून दिवसरात्र कामात गुंतलेले होते. नॅशनल गार्डच्या सैनिकांच्या पहाऱ्यामध्ये कम्युनच्या सतत बैठका होत होत्या.

**1. 'कम्युन' कामगार वर्गाच्या इतिहासातील सर्वाधिक महत्त्वाच्या आणि सर्वाधिक प्रेरक घटनांपैकी एक आहे. एका जबरदस्त क्रांतिकारी उठावाद्वारे पॅरिस मधील कामगार जनतेने भांडवलशाही राज्य हटवून त्याजागी जनतेच्या सरकारच्या आपल्या संस्था स्थापन केल्या आणि 72 दिवसांपर्यंत राजकीय सत्ता आपल्या हातात ठेवली. पॅरिसच्या कामगारांनी खूप कठिण परिस्थितीत शोषण आणि अत्याचाराचा नायनाट केला आणि नव्या पायावर समाजाचे नवनिर्माण करण्यासाठी जीवाची बाजी लावली. त्या 72 दिवसातील घटनांमुळे मिळालेले धडे आजही कामगार वर्गासाठी महत्वपूर्ण आहेत.**

**कम्युनची निवडणूक सार्वत्रिक पुरूष मताधिकाराच्या सिध्दांतानुसार झाली होती. वर्साय येथील प्रतिक्रांतिकारी सरकारने जनतेला निवडणुकीवर बहिष्कार टाकण्यासाठी आव्हान केले होते आणि बुर्झ्वा व अभिजात इलाक्यांमधून पडलेल्या मताची संख्या खूप कमी होती. ही गोष्ट चांगलीच होती कारण याचा अर्थ होता की कम्युन मुख्यत्वे कामगारांमधूनच निवडून आले होते. कम्युनच्या सदस्यांमध्ये राष्ट्रीय गार्डच्या केंद्रीय समितीमधून वार्ले, दूवाल, जूर्द, एद, आणि वाइयां सारखे सर्वात प्रमुख लोक पण होते. राष्ट्रीय गार्डच्या केंद्रीय समितीप्रमाणेच कम्युन पण स्वत:ला पॅरिस शहराची नगरपालिका नाही तर लोकशाहीचे केंद्रिय क्रांतिकारी सरकार मानत होते.**

**2. कम्युनने सर्वोच्च विधीमंडळाच्या रुपात काम करत कायदे बनवण्यास सुरवात केली होती. सोबतच ती कायदा लागू करण्यावरही लक्ष ठेवून होती, म्हणजेच कम्युन सर्वोच्च कार्यपालिका सुद्धा होती. विधीमंडळ आणि कार्यपालिका यांच्या शक्तीचे एकाच गटामध्ये संयोजन हे कम्युनच्या सर्वात महत्त्वाच्या गुणवैशिष्ट्यांपैकी एक होते.**

**केंद्रीय समितीने सुरू केलेल्या जुन्या बुर्झ्वा राज्ययंत्रणेचा नाश करण्याच्या कामाला कम्युनने पूर्ण केले. कायमस्वरुपी सैन्य आणि पोलीस यांना या वेळेपर्यंत आधिकारिकरित्या भंग केले गेले होते. तोडफोडीच्या कामाशी संलग्न असलेल्या जुन्या नोकरशाही यंत्रणेच्या जागेवर जनतेच्या पंक्तीतून आलेल्या नवीन कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात आले होते. कम्युनने आदेश काढून नोकरशाहीमधील खूप मोठे वेतन घेणाऱ्या सदस्यांना काढून टाकले आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वरची मर्यादा आखून दिली, ज्यांचे लक्ष्य साधारण सरकारी कर्मचाऱ्याचे वेतन कुशल कामगाराच्या वेतनाच्या स्तरावर घेवून येणे असे होते. कम्युनने असाही आदेश दिला की सरकारी कर्मचारी जनतेद्वारे निवडून आले पाहिजेत, त्यांना जनतेसमोर उत्तरदायी व्हावे लागेल आणि कोणत्याही वेळी जनतेच्या मागणीनुसार त्यांना परत बोलावले जावू शकेल.**





कम्युनच्या बैठकीचे एक दृष्य “कम्युन मध्ये कामगार आणि त्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधीच बसत असत; त्यामुळे सर्व निर्णय निश्चितपणे कामगार वर्गीय चरित्राचे असत.” – कामगारांचे महान नेते आणि शिक्षक फ्रेडरिक एंगल्सचे शब्द.


# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प सहावे)

3. राष्ट्रीय गार्डच्या केंद्रीय समितीने आणि कम्युनने टाकलेल्या या सर्व पावलांनी एक नव्या प्रकारच्या सरकारचा पाया घातला, ज्याचा इतिहासात कोणताही दाखला नव्हता. परंतु खुद्द पॅरिसच्या कामगारांना आणि त्यांच्या नेत्यांना—कम्युनच्या सदस्यांना—सुद्धा अंदाज नव्हता की ते कोणत्या गोष्टीचे निर्माण करत आहेत. लोक आणि कम्युनमधील त्यांचे प्रतिनिधी जीवनाच्या अनुभवानुसार काम करत असताना सर्वसामान्य जनतेच्या सृजनात्मक शक्तीलाच साकार करत होते. जनतेच्या या रचनात्मक शक्तीच्या दिशेचे आणि तिच्या वास्तविक महत्त्वाचे सर्वात पहिल्यांदा वर्णन कार्ल मार्क्सने केलेले होते. त्याने सांगितले होते की 1871 ची पॅरिस कम्युन वस्तुत: त्या कामगारवर्गीय अधिनायकत्त्वाचे उदाहरण होते ज्याच्या आगमनाची त्याने आपल्या 1848-1850मधील आपल्या लेखांमध्ये घोषणा केलेली होती.



पहिल्या इंटरनॅशनलचे अध्यक्ष कार्ल मार्क्स




RÉPUBLIQUE FRANÇAISE.

LIBERTÉ, EGALITÉ, FRATERNITÉ.

AU PEUPLE.

Citoyens,

Le Peuple de Paris a secoué le joug qu'on essayait de lui imposer.

Calme, impassible dans sa force, il a attendu sans crainte comme sans provocation les fous éhontés qui voulaient toucher à la République.

Cette fois, nos frères de l'armée n'ont pas voulu porter la main sur l'arche sainte de nos libertés. Merci à tous; et que Paris et la France jettent ensemble les bases d'une République acclamée avec toutes ses conséquences, le seul Gouvernement qui fermera pour toujours l'ère des invasions et des guerres civiles.

L'état de siége est levé.


Le Peuple de Paris est convoqué dans ses sections pour faire ses Élections communales.

La sûreté de tous les citoyens est assurée par le concours de la Garde nationale.


*Le Comité central de la Garde nationale,*

ASSI, BILLIORAY, FERRAT, BABICK, Édouard MOREAU, C. DUPONT, VARLIN, BOURSIER, MORTIER, GOUHIER, LAVALETTE, Fr. JOURDE, ROUSSEAU, Ch. LULLIER, BLANCHET, J. GROLLARD, BARROUD, H. GERESME, FABRE, POUGERET.

पॅरिस कम्युनच्या स्थापनेच्या दुसऱ्या दिवशी नॅशनल गार्डच्या केंद्रिय समितीच्या वतीने प्रसारित केलेले पोस्टर. त्यात सांगितले आहे की—"नागरिकहो, पॅरिसच्या जनतेने तिच्यावर लादलेले गुलामीचे ओझे उतरवून फेकून दिले आहे!...पॅरिस आणि फ्रांस मिळून एका गणराज्याचा पाया रचतील आणि त्याच्या होणाऱ्या सर्व परिणामांसोबत ही घोषणा केली जाईल, हेच एकमात्र असे सरकार असेल की जे सततचे हल्ले आणि गृहयुद्ध यांचा अंत करू शकेल."



पॅरिसच्या पँथियनच्या इमारतीवर फडकणारा कम्युनचा लाल झेंडा.


RÉPUBLIQUE FRANÇAISE

COMMUNE DE PARIS

Citoyens,

Votre Commune est constituée.

Le vote du 26 mars a sanctionné la Révolution victorieuse.

Citoyens,


29 मार्चला कम्युनने ही घोषणा प्रसारित केली: "आता तुम्ही स्वत:च तुमच्या नशिबाचे मालिक आहात. तुम्ही आत्ता जे प्रतिनिधी निवडून दिले आहेत, ते तुमच्या समर्थनाच्या बळावर, सत्तेतून बेदखल केल्या गेलेल्या शासकांनी केलेल्या सर्व नुकसानाची भरपाई करतील: अस्ताव्यस्त झालेले उद्योग, ठप्प झालेले काम, बंद पडलेल्या कारभाराला जोमाने परत सुरु केले जाईल."

फ्रांस मध्ये 1830 च्या क्रांतिचे प्रतिक असलेल्या जुलै स्तंभावर सुद्धा कम्युनार्डांनी लाल झेंडा फडकावला.




"अभूतपूर्व कठीण परिस्थितीत काम करत कम्युनचे टिकणे हीच तिच्या यशस्वितेचे सर्वात मोठे प्रमाण आहे. पॅरिस कम्युनद्वारे फडकावलेला लाल झेंडा पॅरिसच्या कामगारांच्या सरकारचे निशाण आहे. त्यानी स्पष्टपणे, समजून–उमजून घोषणा केली आहे की श्रमाची मुक्तता आणि समाजाला बदलणे त्यांचे लक्ष्य आहे." - कामगार वर्गाचा महान नेता आणि शिक्षक कार्ल मार्क्स याचे शब्द.

4. नक्कीच, पॅरिस कम्युनमध्ये कामगारवर्गाच्या अधिनायकत्वाला पूर्ण रुपात विकसित होणे शक्य नव्हते. कम्युन हा अशा प्रकारच्या अधिनायकत्त्वाच्या स्थापनेचा पहिला प्रयत्न होता. त्याचे नेते प्रयोग करत होते आणि त्यांनी काही गंभीर चुकाही केल्या. तरीपण कम्युनने हे दाखवले की कामगार वर्ग भांडवलशाही राज्ययंत्रणा नष्ट करण्यात, तिच्या स्थानावर राज्ययंत्रणेच्या उच्चतर स्वरूपाची स्थापना करण्यात, आणि अशा प्रकारच्या लोकशाहीच्या उच्चतर स्वरूपाचा—बहुतांशांच्या हिताच्या, जनतेच्या हिताच्या—कामगार लोकशाहीचा रस्ता प्रशस्त करण्यात समर्थ आहे आणि असे केलेही पाहिजे.




कम्युनार्डांद्वारे आपल्या वर्दीवर लावण्यात येणारा बिल्ला. यावर हे शब्द लिहिलेले होते— स्वातंत्र्य,समता, बंधुता.




कम्युन तर्फे निघणाऱ्या एका वर्तमान पत्राचे मुखपृष्ठ.

5. केवळ 72 दिवसाच्या आपल्या छोट्या कारकिर्दीत कम्युनने हे दाखवून दिले की वास्तवात ते एक लोकशाही शासन होते, ज्यासाठी पहिला आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न कष्टकरी जनसामान्यांचे कल्याण होते. राष्ट्रीय गार्डच्या केंद्रीय समितीने सत्तेत आल्याबरोबर काही नवे आणि महत्त्वपूर्ण कायदे बनवले होते. क्रांतिच्या यशाच्या पहिल्या दिवशी, 19 मार्चला त्यांनी त्या सर्व राजकीय कैद्यांची शिक्षा माफ केल्याची घोषणा केली, ज्यांना शोषक वर्गाच्या सरकारने अटक केली होती वा शिक्षा दिली होती. गहाण ठेवलेल्या वस्तुंची विक्री करण्यावर बंदी घातली गेली आणि 15 फ्रँक पेक्षा कमी किंमत असणाऱ्या गहाण वस्तू त्यांच्या मालकाला परत देण्याचे आदेश ताबडतोब प्रसारित केले गेले. याचप्रकारे भाडे न देवू शकणाऱ्या भाडेकरूंना घरातून काढण्यावर बंदी घालण्यात आली. या सर्व कायद्यांचा हेतु कामगार आणि गरीब यांच्या हितांचे रक्षण करणे हा होता. राष्ट्रीय गार्डच्या सैनिकांना नियमित वेतन देण्याकरिता आणि गरिबांना अनुदानस्वरूपात वाटण्यासाठी 10 लाख फ्रँक देण्याचा आदेश प्रसारित करण्यामागेही हाच हेतू होता. कम्युनने 16 एप्रिल रोजी एक आदेश काढून असे सर्व उद्योग कामगार आणि उत्पादकाच्या संघाना हस्तांतरित केले, ज्यांना त्यांचे मालक सोडून पळून गेले होते. हा आदेश खरोखर समाजवादी स्वरूपाचा होता आणि कम्युन आणखी काही दिवस चालली असती तर नक्कीच तिचे समाजवादी चरित्र आणखी अधिक स्पष्टपणे समोर आले असते.

अशाप्रकारे कम्युनने पॅरिस मधून पळून गेलेल्या बुर्ज्वा मालकांचे सर्व फ्लॅट जप्त केले आणि त्यांना शहराचे रक्षण करणाऱ्यांना, आणि सर्वात आधी त्या लोकांना ज्याचे घर लढाईच्या काळात क्षतिग्रस्त झाले होते, वाटण्याची व्यवस्था केली. चर्चला राज्यकारभारापासून वेगळे केले गेले. जनसामान्यांमध्ये शिक्षणाच्या प्रसारासाठी महत्वपूर्ण पाऊले उचलली गेली—लुव्र, त्युइल्येरी, आणि अमूल्य कलावस्तूंनी सज्ज इतर संग्रहालयांना आणि महालांना सर्वसामान्य लोकांसाठी खुले केले गेले; आणि कलेच्या सर्व शाखांना व सर्वांसाठी शालेय शिक्षणाला सर्वप्रकारे प्रोत्साहन दिले गेले.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प सहावे)

**6.** या सर्व उपायांनी कम्युनने हे चांगल्या प्रकारे दाखवून दिले की कामगार वर्गाचे सरकार जनतेच्या कल्याणासाठी किती जबरदस्त काम करू शकते. परंतु कम्युनने साध्य केलेल्या गोष्टींना अमर बनवणाऱ्या पावलांसोबत अनेक चुका पण झाल्या, ज्या प्रतिक्रांतिकारी भांडवलदारां विरूद्ध संघर्षामध्ये घातक सिद्ध झाल्या.

यामध्ये सर्वात मोठी चूक तीच होती जी 18 मार्चच्या गौरवशाली विजयानंतर लगेच केली गेली. ती म्हणजे कम्युनार्डांनी त्या सैनिकांना विनाअडथळा परत जाऊ दिले जे थियेरप्रति इमानदार होते. यापेक्षा मोठी चूक ही होती की पॅरिसचे लोक आपल्या विजयाला त्याच्या तर्कसंगत परिणामांपर्यंत घेऊन गेले नाहीत; म्हणजे पुढाकार घेऊन व्हर्सायला जाणे, थियेरच्या निराश सेनेवर संहारक घाव घालणे आणि देशभर क्रांतिचा विजय पक्का करण्यासाठी लढणे. हे सर्व सोडून राष्ट्रीय गार्डची केंद्रीय समिती निष्क्रीय बनून हे पहात राहिली की फासा कोणाच्या बाजूने पडतो. या घातक दिरंगाईमुळे व्हर्साय येथील सरकारला आपल्या सुरवातीच्या पराजयातून सावरणे, क्रांतिला पॅरिस पर्यंत मर्यादित ठेवणे आणि शहरावर पर्यायी हल्ला करण्यासाठी तयारी करणे शक्य झाले.



कम्युन तर्फे चालवण्यात येणाऱ्या सामुहिक भोजनालयच्या बाहेर लोकांचा समुदाय. कम्युनकरिता दिवस-रात्र काम करणाऱ्या लोकांसाठी आणि गरीब कष्टकऱ्यांच्या मदतीसाठी अशी असंख्य भोजनालये, दवाखाने, आणि मुलांची देखभाल करणारी केंद्रे चालवली जात होती. यांची जबाबदारी घेण्यात महत्त्वाची भुमिका महिलांची होती.

**7.** 18 मार्च नंतर लगेचच इतर काही शहरांमध्ये—लियो, मार्सेई, साँ-एत्येन, तुलूज, पपीन्याँ, क्रेजो, इत्यादीमध्ये—सुद्धा कम्युनची स्थापना झाली. हे या गोष्टीचे द्योतक होते की, पॅरिस मध्ये जो जनविद्रोह सुरू झाला होता तो पसरत सर्व देशाला सुद्धा आपल्या कवेत घेवू शकत होता. परंतु कम्युनचे नेते या आक्रमक कारवायांचे नितांत महत्त्व समजू शकले नाहीत. यामुळे भांडवलदार वर्गाला देशाच्या विविध भागांमधील क्रांत्यांची वेगवेगळी केंद्रे चिरडणे शक्य झाले. एप्रिलच्या सुरवातीपर्यंत प्रांतांमधील या सर्व विद्रोहांना चिरडून टाकले गेले होते आणि बुर्ज्वा प्रतिक्रांतिकारी शक्तींना आपले सर्व प्रयत्न पॅरिसच्या विरोधात एकत्र करणे शक्य झाले होते.

या वेळेपर्यंत पॅरिस शहर देशाच्या इतर भागांपासून तुटले गेले होते. या परिस्थितीत राजधानीतील कामगार खेड्यातील कामगारांसोबत आवश्यक अशी युती स्थापित करू शकले नाहीत. कम्युनच्या नेत्यांना ही गोष्ट माहित होती आणि क्रांतिकारी सरकारने शेतकऱ्यांना संबोधित करत खूप सारी आवाहने पण प्रसरित केली होती. परंतु कम्युनार्ड शेतकरी समुदायासोबत आघाडी बनवण्याच्या आणि त्या समर्थनाचा वापर करून घेण्याच्या स्थितीत अजिबात नव्हते.

कम्युनने शेतमजूर आणि शेतकऱ्यांना पॅरिस कम्युनला साथ देण्यासाठी आवाहन केले होते. खेड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पत्रके वाटली गेली होती, ज्यांमध्ये हा सरळ पण शक्तिशाली संदेश होता. "आपले हित एकच आहे." कामगारांनी त्यावेळी नुकत्याच लागलेल्या विज्ञानाच्या एक नव्या शोधाचा, गरम हवेच्या फुग्याचा, सुद्धा उपयोग केला आणि खेड्यांमध्ये त्यातून पत्रके फेकली ज्यांवर असे लिहीलेले होते: "खेड्यात राहणाऱ्या लोकांनो, तुम्ही सहजतेने बघू शकता की पॅरिस ज्या उद्दिष्टांसाठी लढत आहे, ते तुमचे पण उद्दिष्ट आहे. म्हणजेच तुम्ही कामगारांना मदत करून स्वत:चीही मदत करत आहात. पॅरिसवर आत्ता जो जनरल हल्ला करत आहे, तो तोच आहे ज्याने फ्रांसच्या संरक्षणासोबत गद्दारी केली होती. जर पॅरिसची हार झाली तर तुमच्या मानेवरील गुलामीचे जोखड तुमच्या मुलांच्या मानेवर सुद्धा जाईलच. म्हणून पॅरिसला जिंकण्यासाठी मदत करा. कोणत्याही परिस्थितीत ही उद्दिष्टे लक्षात असू द्या, कारण जोपर्यंत ही उद्दिष्टे पूर्ण होत नाहीत, तो पर्यंत जगात क्रांत्या होत राहतील: कसणाऱ्याला जमीन, उत्पादनाची साधने कामगारांना, प्रत्येक हाताला काम.






या चित्रात कम्युनला एका स्त्रिच्या रूपात दाखवले गेले आहे. जी एका हाताने 'अज्ञाना'च्या आणि दुसऱ्या हाताने "प्रतिक्रियावादा"च्या, अशा दोन बुटक्या सैतानांना दाबत आहे.

कम्युनने रुढीवादावर आणि राज्यकारभारामध्ये धर्माच्या दखलीवर कशाप्रकारे प्रहार केला होता, याची चुणूक खाली दिलेली नोटीस वाचून समजते. पॅरिसमध्ये मोन्तमार्त चर्चच्या दारावर चिटकवलेल्या नोटीस मध्ये हे लिहिलेले होते की, "पादरी डाकू आहेत,आणि चर्च त्यांचे असे अड्डे आहेत जेथे ते जनतेची नैतिक हत्या करत असतात; आणि फ्रांसचे बदनाम बोनापार्त, फाव्र,आणि त्रोचू (शासक व मंत्री) यांच्या पुढे ते गुडघे टेकायला भाग पाडत होते; त्यामुळे जुन्या पोलिस जिल्ह्याचे दगड कापणाऱ्या कारागिरांचे प्रतिनिधी हा आदेश देत आहेत की सेंट-पियेर येथील चर्च बंद केले जावे आणि तेथील पादरी तसेच त्यांच्या मूर्ख भक्तांना अटक केली जावी."



पॅरिस कम्युन सोबत एकता प्रदर्शित करत ब्रिटन, जर्मनी, आणि युरोपातील काही अन्य देशात आंदोलन उभे राहिले. मार्क्सच्या प्रस्तावावर आंतरराष्ट्रीयच्या जनरल कौन्सिलने पॅरिसच्या घटनेबाबत कामगारांना कळवण्यासाठी आपले सदस्य जागोजागी पाठवण्याचा प्रस्ताव पारित केला.

लंडनमधील पॅरिस कम्युनच्या समर्थनातील एका आंदोलनाचे चित्र.

**8**

कम्युनच्या पुढाकारामध्ये समाजाची जी सामाजिक व राजकीय घडण हळू-हळू वर येत होती, ती खात्रीने समाजवादी होती. परंतु अशा समाजाचे कोणतेही अगोदरचे उदाहरण उपलब्ध नव्हते; त्यांच्याकडे कुठलाही स्पष्ट आणि तयार कार्यक्रम नव्हता; ते चहूबाजूने रक्तपिपासू शत्रूंनी घेरलेले होते; आणि घेरेबंदी व युद्धाने मोठी सामाजिक व आर्थिक अव्यवस्था निर्माण केली होती. अशा परिस्थितीत कामगारांना आपल्या हितानुरूप समाजाला संघटित करण्यासाठी ठोस गरजांनुसार तातडीने नव-नवे निर्णय घ्यावे लागत होते. त्यांनी अनेक चूका केल्या; परंतु तरीही कामगारांद्वारे उचलल्या गेलेल्या सर्व महत्त्वपूर्ण पावलांची दिशा मजुरवर्गाच्या संपूर्ण सामाजिक आणि आर्थिक मुक्तीचे संकेत दाखवत होती. कम्युनची शोकांतिका ही होती की तिला कुठलाही वेळ मिळाला नाही. समाजवादाच्या दिशेने पुढे जाण्याच्या कोणत्याही शक्यतेला थियेरच्या सैन्याच्या परतण्याने आणि त्यानंतरच्या भयंकर रक्तपाताने संपवून टाकले.

...पुढील अंकात चालू

# तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाची 75 वर्षे
# मिळकत आणि शिकवण (पहिला भाग)



महान लोकचित्रकार चित्तप्रसाद यांचे वुडकट प्रिंट – तेलंगणा

✎ आनंद सिंह

भारताच्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्त्वामध्ये चाललेल्या तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाच्या (तेलुगूमध्ये 'तेलंगणा रैतुंगा सायुध पोराटम') गौरवशाली वारशाला भारताच्या सत्ताधाऱ्यांद्वारे षडयंत्रकारी पद्धतीने लपवले गेल्यामुळे देशाच्या इतर भागातील सामान्य लोकांना तेलंगणाच्या शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या या झुंझार बंडाचा परिचय नाही. परंतु तेलंगणामध्ये ही शौर्यगाथा लोकसंस्कृतीच्या सर्व रूपांमध्ये जनमानसामध्ये आजही जिवंत आहे. दोड्डी कोमरैय्या आणि चाकली ऐलम्मासारख्यां शेतकरी बंडांतील अग्रणींची गणती तेलंगणाच्या नायक आणि नायिकांमध्ये केली जाते. या गौरवशाली इतिहासावर तेलुगू मध्ये अनेक सिनेमे सुद्धा बनले आहेत, ज्यांमध्ये कृष्ण चंदरची हिंदी कादंबरी 'जेव्हा शेतं जागी झाली' वर आधारित आणि गौतम घोष दिग्दर्शित फिल्म 'मा भूमी' (आपली जमीन) सर्वात उत्तम आहे. तेलंगणा शेतकऱ्यांच्या या शौर्यशाली संघर्षाची सुरुवात होऊन 75 वर्षे पूर्ण होण्याच्या निमित्ताने त्याच्या गौरवशाली वारशाला, त्याच्या मिळकतींना, आणि त्यापासून मिळणाऱ्या शिकवणीला वाचकांसोबत परिचित करवण्यासाठी आम्ही 'कामगार बिगुल' मध्ये एक विशेष लेख प्रस्तुत करत आहोत जो जागेअभावी दोन भागांमध्ये प्रकाशित केला जाईल. पहिल्या भागामध्ये आम्ही तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाची पार्श्वभूमी, त्याची सुरुवात, निझामाच्या सत्तेकडून दमन होऊनही त्याच्या सतत झालेल्या विकासाची चर्चा करू. दुसऱ्या भागामध्ये आपण पाहू की कशाप्रकारे हैदराबाद संस्थानाच्या भारतात विलयानंतर, भारताच्या भांडवली राज्यसत्तेने तेलंगणा संघर्षाला सैन्याच्या आधाराने चिरडण्याच्या सर्व प्रयत्नांनंतरही हा सशस्त्र संघर्ष 3 वर्षे कसा चालू राहिला आणि कशाप्रकारे भारताच्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाने या दरम्यान डाव्या आणि उजव्या विचलनांमध्ये झुलत शेवटी अत्यंत लाजिरवाण्या पद्धतीने भारतातील भांडवली सत्तेसमोर विनाशर्त आत्मसमर्पण करत या ऐतिहासिक संघर्षाला मागे घेतले याबद्दल आणि सोबतच आपण त्या संघर्षाच्या मिळकतीबद्दल, त्यातून मिळणाऱ्या शिकवणीबद्दल आणि आजच्या काळातील त्याच्या प्रासंगिकतेबद्दलही बोलू. या लेखामधील अनेक तथ्य पी. सुंदरैय्या लिखित पुस्तक 'तेलंगणा पीपल्स स्ट्रगल ॲंड इट्स लेसन्स' मधून घेतले आहेत, परंतु आमचे विश्लेषण यापेक्षा एकदम वेगळे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतातून ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी तडकाफडकी परत जाण्याचा निर्णय घेतला, याचे सर्वात मोठे कारण तेव्हा देशात बनलेली स्फोटक परिस्थिती होती. आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांवर खटल्यानंतर संपूर्ण देशामध्ये जबरदस्त आक्रोश, नौसेनेमध्ये बंड, तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्ष, तेभागा आणि पुनप्रा-वायलार मध्ये शेतकरी विद्रोह, देशाच्या विविध भागांमध्ये कामगारांच्या झुंझार आंदोलनासारख्या घटनांमुळे इंग्रजांची खात्री पटली होती की आता भारतावर राज्य करणे त्यांना जमणार नाही. परंतु उपरोध असा की देशाच्या स्वातंत्र्याच्या ठीक अगोदर घडलेल्या या ऐतिहासिक घटनांची चर्चा इतिहासाच्या पुस्तकांमध्ये जवळपास कुठेही मिळत नाही. स्वातंत्र्याच्या नंतर सत्तेमध्ये आलेल्या भारतीय भांडवलदार वर्गाच्या प्रतिनिधींनी एका विचारपूर्वक ठरवलेल्या रणनितीचा भाग म्हणून भारतातील जनतेच्या या शौर्यगाथांना विस्मृतीच्या अंधारात ढकलले, जेणेकरून लोकांना राज्यकर्त्यांच्या जनद्रोही कारवायांबद्दल माहिती होऊच नये. यामध्ये तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्ष सर्वात महत्त्वाचा आणि बेजोड होता कारण हा शौर्यपूर्ण संघर्ष स्वातंत्र्यानंतर सुद्धा 4 वर्षे चालू राहिला आणि त्याने ना फक्त हैदराबादच्या निझामाच्या क्रूर सामंती निरंकुश सत्तेचे चरित्र उघडे पाडले होते, तर स्वतंत्र भारताच्या निर्दयी भांडवली सत्तेचे सुद्धा अत्यंत जनविरोधी चरित्र सर्वांसमोर आणले होते.

तेलंगणा शेतकरी संघर्ष अनेक टप्प्यांमधून गेला. सुरुवातीला जहागिरदार, देशमुख आणि जमिनदारांच्या वाढत्या अत्याचाराच्या विरोधात शेतकऱ्यांनी काही मागण्या घेऊन सुरू केलेले आंदोलन बघता-बघता हैदराबादच्या निझामाच्या निरंकुश सामंती सत्तेविरोधात एका सशस्त्र आंदोलनात परिवर्तित झाले. निझामाचे पोलिस, फौज आणि रझाकार नावाच्या इस्लामिक कट्टरपंथी सेनेद्वारे पाशवी दमनाच्या प्रयत्नांनंतरही या सशस्त्र संघर्षाची आग विझली तर नाहीच, उलट वेगवेगळ्या भागांमध्ये पसरत गेली. सप्टेंबर 1948 मध्ये भारतीय सेनेने हैदराबादला भारताच्या संघराज्यात सामील केल्यानंतर शेतकरी विद्रोहाचे दमन सुरू केले, ज्यामुळे संघर्षाचे एक नवे पर्व सुरु झाले. त्यांच्या नेतृत्वाने लाजिरवाण्या पद्धतीने आत्मसमर्पण केलेले असले तरी, निझामाच्या सशस्त्र सेनेला धूळ चारणाऱ्या बहादुर कम्युनिस्ट आणि शेतकरी लढवैय्यांनी शक्तिशाली भारतीय सेनेचा जोमाने मुकाबला केला आणि शेवटपर्यंत हार मानली नाही. या संघर्षाच्या विराट रूपाचा अंदाज यावरून लावला जाऊ शकतो की यादरम्यान तेलंगणाच्या 16 हजार वर्ग किमी क्षेत्रामध्ये 3 हजार गावांमध्ये राहणाऱ्या जवळपास 30 लाख लोकसंख्येने सामंती भूस्वामींना त्यांच्या महालवजा घरांमधून शहरांकडे हाकलले आणि स्वत:ला क्रांतिकारी ग्राम-राज्यांमध्ये संघटित केले होते. या संघर्षाचे केंद्र तेलंगणाच्या नालगोंडा, वारंगल आणि खम्मम जिल्ह्यांमध्ये होते, परंतु तेलंगणाचे इतर अनेक जिल्हे सुद्धा यांच्या कचाट्यात आले होते. लोकसमित्यांच्या देखरेखीखाली जवळपास 10 लाख एकर जमिन शेतकऱ्यांमध्ये वाटली गेली होती. वेट्टी (सक्तीच्या श्रमाची व्यवस्था) ची पद्धत संपवली गेली होती, शेतमजुरांची किमान मजुरी वाढवली गेली होती आणि किमान मजुरीला सक्तीने लागू केले जात होते. या संघर्षांच्या दरम्यान किमान 4 हजार कम्युनिस्ट आणि शेतकरी बंडखोरांनी आपला जीव गमावला आणि जवळपास 10 हजार बंडखोरांना 3 ते 4 वर्षे तुरुंगात रहावे लागले.

### निझामाचे निरंकुश सामंती शासन आणि शेतकरी व कष्टकऱ्यांची खस्ताहालत

तेलंगणा शेतकरी सशस्त्र विद्रोह ज्या भागामध्ये झाला, तो हैदराबाद संस्थानामध्ये येतो, जे भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी अस्तित्वात असलेल्या 565 संस्थानांपैकी सर्वात मोठे होते. या संस्थानाची स्थापना मुघल बादशाह औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल साम्राज्याच्या विघटनाच्या काळात दक्षिणेकडील मुघल सुभेदार मीर कमरूद्दीन खान (आसफ जाह) याने 1724 मध्ये केली होती. आसफ जाहने स्वत:करिता निझाम-उल-मुल्कची उपाधी घेतली होती, त्यामुळे या राजवटीला निझामशाहीच्या नावाने ओळखले जाते. निझामांनी मराठ्यांसोबत संघर्ष केला आणि दक्षिण भारताच्या मोठ्या हिश्श्यावर कब्जा कायम ठेवला, तसेच भारतात इंग्रजी प्रभुत्व स्थापन झाल्यानंतर त्यांची अधिनता स्विकारून त्याने आपल्या निरंकुश सामंती सत्तेला कायम ठेवले. तेलंगणा विद्रोहाच्या वेळी हैदराबाद राजवटीची तीन भाग होते, ज्यांपैकी जवळपास 50 टक्के आजच्या तेलंगणा राज्यामध्ये येतो व त्यात 8 तेलुगू भाषिक जिल्हे आणि हैदराबाद सामील होते, 28 टक्के क्षेत्र मराठवाड्याचे होते ज्यामध्ये 5 मराठी जिल्हे सामील होते आणि 22 टक्के क्षेत्र कर्नाटकचे होते ज्यामध्ये 3 कन्नड भाषिक जिल्हे सामील होते. तेलंगणा संघर्षाच्या वेळी हैदराबादच्या राजवटीकडे जवळपास 5 कोटी 30 लाख एकर जमिनीच्या 60 टक्के भागावर राज्य सरकारची जमिन-महसूल व्यवस्था (दिवाणी वा खालसा) लागू होती. या भागांमध्ये रयतवारी व्यवस्थेच्या अंतर्गत सरकारी अधिकारी कर वसूल करत होते. या करवसुली मध्ये देशमुख, देशपांडे, देसाई आणि सरदेसाई सारख्या उपाध्या असणाऱ्या मध्यस्थांची भुमिका मुख्य होती. या मध्यस्थांनी शेतकऱ्यांना धोका देऊन त्यांची हजारो एकर जमीन हडपून आपली संपत्ती बनवली होती आणि शेतकऱ्यांना काश्तकारांमध्ये रूपांतरीत केले होते. अशाप्रकाचे भूस्वामी बहुतेक रेड्डी आणि वेलमा जातींमधून येत. या भूस्वामींकडे किती मोठ्या प्रमाणात जमिनींवर ताबा होता याचा अंदाज यावरून केला जाऊ शकतो की तेलंगणा संघर्षाच्या अगोदर जन्नारेड्डी प्रताप रेड्डी परिवारासारखे भूस्वामी होते ज्यांच्याकडे दीड लाख एकरापर्यंत जमिनी होत्या, आणि 750 एकर जमिनीवर आंब्याच्या बागा होत्या.

हैदराबाद संस्थानाच्या जमिनींच्या तीस टक्के भागावर जहागिरदारी व्यवस्था होती. आसफजाही निझाम आपल्या विश्वासपात्रांना (ज्यांमध्ये मुस्लिम आणि हिंदू दोन्ही सामील होते) सैनिकी व अन्य सेवांच्या बदल्यात जहागिरींच्या रूपाने काही गावांमध्ये जमिन-महसूल (जमिनींचा खंड) वसूल करण्याचा अधिकार देत असे. काळानुसार या जहागिरी खानदानी बनत गेल्या. जहागिरदारांना काही प्रकारचे कर वसूल करण्याचा अधिकार होता आणि ते पोलिस व न्यायालयाची कामेही निभावत. जहागिरदारांच्या शिवाय गावांमध्ये काही पारंपारिक हिंदू शासक सुद्धा होते जे निझामाच्या काळा अगोदरपासून त्या भागांमध्ये शासनयंत्रणेचा हिस्सा होते. अशा भूस्वामींना संस्थानम म्हटले जाई आणि निझामाने वार्षिक पेशगीच्या बदल्यात त्यांना मान्यता दिली होती. संस्थानाच्या जमिनीच्या जवळपास 10 टक्के हिश्श्यावर निझामाची खाजगी मालकी होती ज्याला सर्फ-खास म्हटले जाई. या जमिनीपासून निझामाला दरवर्षी जवळपास 2 कोटी रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळत होते जे त्याच्या आणि त्याच्या परिवाराच्या ऐयाशीवर खर्च होई. याशिवाय निझामाला जवळपास 70 लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम संस्थानाच्या खजिन्यातून दिली जात होती.

पान 12 वर

# तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाची 75 वर्षे
# मिळकत आणि शिकवण (पहिला भाग)

पान 12 वरून

हैदराबाद संस्थानामध्ये विशेषत: जहागिरदारी आणि खालसा भागांमध्ये शेतकऱ्यांचे जबरदस्त शोषण आणि उत्पीडन होई. शेतकऱ्यांना त्यांच्याच जमिनींपासून बेदखल करून त्यांना काश्तकार बनवणे सामान्य गोष्ट होती. विशेषत: तेलंगणाच्या भागात भूस्वामींची दहशत टोकाला पोहोचलेली होती. याच भागामध्ये कुख्यात वेट्टी प्रथा प्रचलित होती जिच्याअंतर्गत सर्व जाती आणि व्यवसायाच्या लोकांना भूस्वामींकडे मोफत सेवा द्यावी लागत असे. प्रत्येक दलित कामगार परिवारातून कमीत कमी एक व्यक्ती वेट्टी सेवेसाठी पाठवावा लागे. चमड्याचे काम करणाऱ्या मडिगा जातीच्या लोकांना चप्पल आणि बॅग सारख्या चामड्याच्या वस्तू भूस्वामींना मोफत द्याव्या लागत. अशाचप्रकारे बढई, लोहार, न्हावी, धोबी, ताडी काढणारे, इत्यादी व्यवसाय करणाऱ्या लोकांना भूस्वामींना मोफत सेवा द्यावी लागे. जेव्हा महसूल, पोलिस, वन, अबकारी (एक्साईज) आणि इतर विभागांचे अधिकारी गावांचा दौरा करत तेव्हा गावकऱ्यांना त्यांनाही मोफत सेवा द्यावी लागे. अशाचप्रकारे वारंगल आणि नालगोंडा भागामध्ये भगेला प्रथेद्वारे आदिवासींना भूस्वामींकडे कर्जाच्या बदल्यात पिढ्यानपिढ्या विविध प्रकारची सेवा द्यावी लागे. सर्वात वाईट स्थिती महिलांची होती. सर्व मुलींना भूस्वामींकडे दासी म्हणून रहावे लागे. ज्या महिला भूस्वामींच्या शेतांमध्ये काम करत त्यांना पूर्णत: भूस्वामींच्या दयेवर रहावे लागे. शेतावर काम करताना त्या आपल्या मुलांना दूधही पाजू शकत नसत. भूस्वामींना महिलांचे लैंगिक शोषण करण्याचा पूर्ण अधिकार होता. हैदराबाद संस्थानामध्ये फक्त 12 टक्के लोकच उर्दूभाषिक होते, जे हैदराबाद शहरात रहात असत, आणि इतर 88 टक्के लोक तेलुगू, मराठी आणि कन्नड बोलणारे होते, परंतु शाळांमध्ये शिक्षणाचे माध्यम फक्त उर्दू होते ज्यामुळे गैर-उर्दूभाषी अधिकांश लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध नव्हती. महिला तर शिक्षणाबद्दल विचारही करू शकत नव्हत्या. याचमुळे साक्षरतेचा दर फक्त 6 टक्के होता. सरकारी कारभार सुद्धा फक्त उर्दू मध्येच चाले. पहिल्या महायुद्धाच्या वेळी हैदराबादमध्ये तेलुगू, मराठी आणि कानडी भाषेमध्ये एकही वर्तमानपत्र निघत नव्हते. अशाप्रकारे हैदराबाद संस्थानाच्या बहुसंख्य लोकसंख्येला ना फक्त आर्थिक रूपाने शोषण आणि अत्याचाराचा सामना करावा लागत होता, तर भाषिक आणि सांस्कृतिक भेदभाव आणि अत्याचाराचाही सामना करावा लागत होता. याशिवाय तेलंगणाच्या भागात तेव्हा जवळपास 500 कारखाने होते, ज्यांमध्ये 28 हजार कामगार काम करत होते. हे कारखाने कापड-उद्योग, खाणकाम, कागद, इंजिनिअरींग सारख्या क्षेत्रांमध्ये होते आणि त्यांच्या मालकांना निझामाची सत्ता मोठ्या प्रमाणात सबसिडी आणि अत्यंत स्वस्त दराने कर्ज देत होती. कामगारांना जास्तीत जास्त 15 रुपये प्रति महिना मजुरी मिळत होती. सरकारी विभागांमध्ये जवळपस दोन लाख मुस्लिम काम करत असत, कारण निझाम 'अन्नल मुल्की' (मुस्लिम शासक आहे) अंतर्गत प्रशासनाच्या कामांमध्ये मुस्लिमांना प्राधान्य देत होता. अर्थात, या कर्मचाऱ्यांचा पगार सुद्धा महिन्याला जास्तीत जास्त 30 रुपये प्रतिमहिना असे. मोठ्या संख्येमध्ये मुस्लिम लोकसंख्या गालीचे बनवणे, कपड्यांवर छपाई, हँडलूम सारख्या कामांद्वारे कसेबसे दिवस काढत असे. लक्षात घेण्याची गोष्ट ही की निझामाच्या विरोधात बंडामध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम कामगार, शेतकरी, कष्टकरी आणि मध्यमवर्गीय प्रगतिशील मुस्लिमांनी सुद्धा भाग घेतला.

### तेलंगणा मध्ये आंध्र महासभेची वाढ

लक्षात घेतले पाहिजे की स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पक्षाने आपला तडजोडीचा रोख दाखवत हैदराबाद सारख्या संस्थानांमध्ये राजे-रजवाड्यांच्या विरोधात तेथील जनतेला एकजूट, संघटित करण्यात बराच काळ पुढाकारच घेतला नाही. हैदराबाद मध्ये निझामाच्या निरंकुश सत्तेविरोधात काही नागरिक अधिकारांची व प्रशासकीय सुधारांची मागणी करत, 1928 मध्ये तेलंगणाच्या भागात श्री माडपाटी हनुमंतराव यांच्या नेतृत्वामध्ये काही बुद्धिजीवींनी आंध्र महासभा नावाच्या संघटनेची स्थापना केली. याच धर्तीवर मराठी भाषिक क्षेत्रांमध्ये महाराष्ट्र परिषद आणि कन्नड भाषिक क्षेत्रांमध्ये कन्नड परिषदेची सुद्धा स्थापना केली गेली.

जरी आंध्र महासभेची सुरूवात फक्त प्रस्ताव पास करणाऱ्या आणि निवेदन देणाऱ्या एका सुधारणावादी संघटनेच्या रूपाने झाली असली, तरी तेलंगणामध्ये निझामाच्या निरंकुश सामंती सत्तेमुळे आणि भूस्वामींकडून शेतकरी, कामगार आणि कष्टकऱ्यांच्या वाढत्या शोषण आणि अत्याचारासोबतच, ही संघटना काही काळातच लोकांच्या लोकशाही आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एका झुंझार जनसंघटनेमध्ये बदलत गेली. 1940 येता-येता श्री रवी नारायण रेड्डी, बद्दम येल्ला रेड्डी आणि डी. व्यंकटेश्वर रावांसारखे या संघटनेचे अनेक झुंझार नेते भारताच्या कम्युनिस्ट पक्षात सामील झाले आणि हैदराबाद संस्थानामध्ये पार्टीचे नियमित युनिट काम करू लागले. यानंतर संघटनेचे चरित्र अधिक झुंझार आणि निझाम-विरोधी होत गेले. 1944 च्या भोंगीर संमेलनामध्ये आंध्र महासभेमध्ये फूट पडली, ज्यानंतर संघटनेचा गैर-कम्युनिस्ट मवाळ गट वेगळा झाला आणि काही काळानंतर तो राज्य काँग्रेसमध्ये सामील झाला. याचप्रकारे आंध्र महासभेमध्ये कम्युनिस्टांचे पूर्ण वर्चस्व स्थापित झाले. आंध्र महासभेमध्ये कम्युनिस्टांच्या उपस्थितीमुळे ही संघटना गावोगावी पसरली आणि वेट्टी समाप्त करणे, काश्तकारांची हकालपट्टी संपवणे, कसल्या जाणाऱ्या जमिनीवर पट्टा मिळवणे, जहागिरदारी समाप्त करणे, कर आणि खंडामध्ये मोठी कपात, शेतीचे अनिवार्य सर्वेक्षण यासारख्य झुंझार मागण्या उचलू लागली.

दुसऱ्या महायुद्धामध्ये 1941 मध्ये सोवियत संघ सामील झाल्यानंतर भारताच्या कम्युनिस्ट पक्षाने एक चुकीची कार्यदिशा अवलंबत ब्रिटीश विरोधी जनकारवायांना स्थगित करण्याचा निर्णय घेतला ज्यामुळे तो राष्ट्रीय मुक्ती आंदोलनाच्या या महत्त्वपूर्ण काळात देशाच्या अनेक भागांमध्ये जनतेपासून वेगळी पडू लागला. लक्षात घ्यावे की पक्षाने 'इंग्रजांनो भारत सोडा' सारख्या झुंझार जनांदोलनामध्ये सुद्धा भाग घेतला नाही कारण त्याचे असे मानणे होते की त्यावेळी आंदोलन छेडले तर सोवियत संघ कमजोर पडेल आणि फॅसिस्टांना फायदा होईल. देशाच्या स्तरावर कम्युनिस्ट पक्षाद्वारे या चुकीच्या कार्यदिशेनंतर, पक्षाची निष्क्रियता असूनही, तेलंगणा मध्ये पक्ष आणि आंध्र महासभेचे कार्यकर्ते या काळात सतत शेतकऱ्यांमध्ये सक्रिय राहिले आणि वेट्टी संपवणे, अवैध वसूली, करकपात, बेदखली सारखे मुद्दे उचलत राहीले आणि अनेक जागी तर शेतकऱ्यांना हक्क मिळवून देण्यात यशस्वी सुद्धा झाले ज्यामुळे लोकांमध्ये त्यांची लोकप्रियता कायम राहिली. गावांमध्ये आंध्र महासभेच्या युनिटला प्रेमाने संघम म्हणत.

### झुंझार संघर्षाची सुरूवात

1945 मध्ये आंध्र महासभेच्या खम्मम संमेलनामध्ये निझामाच्या निरंकुश सामंती सत्तेला आणि जहागिरदारी व्यवस्थेला उखडून फेकण्याचे आवाहन केले गेले. येणाऱ्या दिवसांमध्ये झुंझार संघर्षाच्या तयारीसाठी गावा-गावांमध्ये संघमचे कार्यकर्ते स्वयंसेवक तुकड्या बनवून लोकांना लाठ्या आणि गोफणी चालवण्याचे प्रशिक्षण देऊ लागले. त्याच वर्षी नालगोंडा जिल्ह्याच्या जनगाव तालुक्याच्या (जो आता वारंगल जिल्ह्यामध्ये येतो) पालाकुर्ती गावामध्ये एक घटना घडली ज्यामुळे तेलंगणाच्या शेतकऱ्यांमध्ये नवउर्जेचा संचार झाला. कुख्यात देशमुख विस्नूर रामचंद्र रेड्डी याने पालाकुर्ती गावामध्ये राहणाऱ्या राजका (धोबी) जातीची एक महिला, चाकली ऐलम्मा, जी संघमची सदस्य होती, तिची जमिन हडपण्यासाठी आपल्या गुंडांना रात्री ऐलम्माच्या शेतातील पीकं कापण्यासाठी पाठवले. परंतु ऐलम्माने संघमच्या मदतीने गुंडांचा सामना करण्याची तयारी अगोदरच करून ठेवली होती. संघमच्या सदस्यांच्या लाठ्या पाहताच देशमुखांच्या गुंडांना पळता भुई थोडी झाली. यानंतर संघमच्या सदस्यांनी शेतातील पीक काढून ऐलम्माच्या घरी पोहोचवले. हा तेलंगणाच्या शेतकऱ्यांचा मोठा विजय होता ज्याने तेलंगणा शेतकरी संघर्षांमध्ये मोठी भुमिका निभावली. यानंतर संघमला गुट्टपाला (लाठी) संघम नावाने लोक ओळखू लागले कारण संघमचे सदस्य भूस्वांमींच्या गुंडांचा सामना लाठ्यांनी, गोफणींनी आणि दगडांनी करू लागले. गावागावांमध्ये पसरलेल्या या संघमांमध्ये ऐलम्मा सारख्या महिला मोठ्या संख्येने भाग घेऊ लागल्या आणि पुरूषांच्या खांद्याला खांदा भिडवून शेवटपर्यंत लढल्या. त्यांची सुरूवातीची हत्यारे मुसळ आणि मिरच्या होत्या, परंतु जसजसा संघर्ष सशस्त्र रूप धारण करू लागला, त्यांनी बंदूक चालवणे सुद्धा शिकले आणि अगोदर निझामाच्या सैन्याला आणि नंतर भारतीय सेनेलाही त्या भिडल्या.

### सशस्त्र विद्रोहाची ठिणगी

तसे तर 1940 च्या दशकाच्या सुरूवातीपासूनच तेलंगणाच्या शेतकऱ्यांनी आंध्र महासभेच्या नेतृत्वामध्ये सामंती भूस्वामींच्या विरोधात संघर्ष चालू केला होता, परंतु 4 जुलै 1946 रोजी जनगाव तालुक्यातील कडावेंडी गावामध्ये ती घटना घडली ज्या घटनेला तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षामध्ये ठिणगी मानले जाते. चाकली ऐलम्माची जमिन हडपू न शकल्यामुळे भडकलेल्या विस्नूर रामचंद्र रेड्डीने त्या घटनेनंतर आपल्या नियंत्रणातील सर्व गावांमध्ये संघमच्या कार्यकर्त्यांना गुंडाकरवी मारहाण केली आणि पोलिसांच्या मदतीने त्यांच्यावर खोटे खटले दाखल करण्याची चाल खेळली. त्या दिवशी कडावेंडी गावातील संघमच्या कार्यकर्त्यांच्या घरांवर गुंडांनी हल्ला केला ज्याविरोधात गावातील लोकांनी संघमच्या नेतृत्वामध्ये लाठ्या, गोफणी घेऊन एक झुंझार मोर्चा काढला. हा मोर्चा जेव्हा रेड्डीच्या महालवजा घराजवळ (गढी) पोहोचला तेव्हा त्या गढीजवळ लपलेल्या लोकांनी गोळीबार चालू केला. या गोळीबारामध्ये गावातील संघमचा नेता दोड्डी कोमरैय्या मारला गेला आणि अनेक लोक जखमी झाले. परंतु यानंतरही गावकरी दटून राहीले. जवळपासच्या गावांमधील लोक शेकडोंच्या संख्येने एकत्र होऊ लागले. लोकांचा संताप इतका तीव्र होता की त्यांनी गढीला आग लावली. ही बातमी ऐकल्यावर देशमुखाचा मुलगा बाबूरावने भयानक हत्यारांनी सज्ज अशा गुंडांच्या फौजेद्वारे गावकऱ्यांवर हल्ला करण्याची योजना बनवली. परंतु गावातील लोकांचा संताप पाहून गुंड सुद्धा पळून गेले. यानंतर गावामध्ये पोलिस आले आणि त्यांनी संघमच्या कार्यकर्त्यांना अटक केली, परंतु गुंडांवर कोणतीही कारवाई केली गेली नाही.

दोड्डी कोमरैय्याच्या शहादतीनंतर शेतकरी विद्रोह जंगलातील आगीप्रमाणे तेलंगणाच्या इतर भागांमध्ये, विशेषत: नालगोंडा, वारंगल आणि खम्मम जिल्ह्यांमध्ये पसरला. लोक बैठकांमध्ये आणि मोर्चांमध्ये कोमरैय्याच्या शौर्याचे आणि शहादतीचे गीत गाऊ लागले. 'अमरजीवी दोड्डी कोमरैय्या जिंदाबाद'चे नारे लावू लागले आणि भूस्वामींच्या गढ्यांसमोर मोर्चे



# तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाची 75 वर्षे

पान 13 वरून

काढून लाल झेंडे गाडू लागले; तसेच वेट्टी, अवैध वसूली आणि बेदखली संपवण्याची मागणी करू लागले. या मोर्चांमध्ये चाकली ऐलम्माच्या शौर्याची संघर्षगीते सुद्धा गायली जात आणि त्यांच्यामध्ये मोठ्या संख्येने महिला सहभागी होत. या वादळी जनांदोलनाचा परिणाम हा झाला की त्याच्या प्रभाव क्षेत्रात येणाऱ्या 300-400 गावांमध्ये वेट्टी प्रथा समाप्त झाली आणि भूस्वामींना शहरांकडे पळावे लागले किंवा गावांमध्ये गपगुमान रहावे लागले. सरकारचे अधिकारी सुद्धा या गावांमधून वसुलीची हिंमत करत नव्हते.



### विद्रोहाला चिरडण्याचे अनेक प्रयत्न; तरीही संघर्ष पसरत गेला

तेलंगणा शेतकरी विद्रोहाच्या पसरत्या आगीने घाबरून निझामाने या आंदोलनाला बळाच्या वापराने चिरडण्याचे ठरवले आणि विद्रोहाने प्रभावित गावांमध्ये सशस्त्र दलांच्या तुकड्या जाऊ लागल्या. जेव्हा या तुकड्या गावांमध्ये जात तेव्हा शेतकरी आणि कामगारांचे नेतृत्व लपून बसे आणि तुकड्या परत जाताच गावांमध्ये परत येत असे. इथपर्यंत की लोक कोर्टाचे आदेश मानण्यास सुद्धा नकार देऊ लागले. यानंतर निझामाच्या फौजा गावांमध्ये कँप लावून राहू लागल्या आणि दिवसरात्र विद्रोही नेत्यांचा शोध घेऊ लागल्या. यातून बचावाकरिता पुरूष गावांपासून दूर शेतांमध्ये रात्र घालवू लागले आणि सैनिकांपासून बचावाकरिता महिला एकत्र समूह बनवून झोपू लागल्या. निझामाच्या सत्तेद्वारे तेलंगणाच्या शेतकरी आणि कामगारांच्या विद्रोहाचे बळपूर्वक दमन करण्याच्या सर्व प्रयत्नांनंतरही हा विद्रोह सतत नवनवीन इलाक्यांमध्ये पसरत गेला. याच दरम्यान 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला आणि सर्व राजे-रजवाड्यांना हा पर्याय दिला गेला की त्यांनी एकतर भारतात सामील व्हावे, किंवा पाकिस्तानात सामील व्हावे, किंवा स्वतंत्र रहावे. हैदराबादच्या निझामाने स्वतंत्र रहाण्याचा निर्णय घेतला आणि स्वतंत्र हैदराबाद बनवणार हे घोषित केले. अशा परिस्थितीत भारतात सामील होण्याचा दबाव निझामावर टाकण्यासाठी सत्याग्रह करण्यासाठी काँग्रेस पक्षाचा नाईलाज झाला. याच नव्या परिस्थितीचा लाभ घेत कम्युनिस्ट पक्ष आणि आंध्र महासभेच्या लोकांनी सुद्धा निझाम-विरोधी आंदोलनामध्ये सामील होत त्याचा आधार विस्तारणे चालू केले. निझामाने या आंदोलनाला चिरडण्यासाठी आपल्या फौजेव्यतिरिक्त त्याने पाळलेल्या मजलिस-ए-इत्तेहाद-उल-मुसलमान (जो स्वातंत्र्यानंतर आपले रूप बदलून आज सुद्धा ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहाद-उल-मुसलमान या नावाने तेलंगणा व इतर काही राज्यांमध्ये सक्रीय आहे) या इस्लामिक कट्टरतावादी संघटनेच्या सेनेचा वापर करण्याची योजना बनवली. कासिम रिझवीच्या नेतृत्वामध्ये रझाकारांच्या या खाजगी सेनेने निझामाच्या सैनेसोबत मिळून तेलंगणाच्या राज्यांमध्ये दहशतीचे राज्य स्थापित केले. रझाकारांनी मोठ्या प्रमाणात लूटमार, हत्या, बलात्कार आणि छळाचा वापर केला. त्यांच्या दहशतीच्या धाकाने काँग्रेस सहीत अनेक भांडवली संघटनांच्या लोकांना आणि धनिकांना हैदराबाद संस्थानाच्या बाहेर अनेक प्रांतांमध्ये आसरा घ्यावा लागला. तेलंगणामध्ये रझाकारांचा सामना फक्त कम्युनिस्ट आणि आंध्र महासभेचे लोक करत होते. कम्युनिस्ट पक्षाने निझामाच्या सामंती सत्तेविरोधात निर्णायक विद्रोह करण्याची घोषणा केली आणि गावांमध्ये लोकांना आवाहन केले की त्यांनी कोणत्याही प्रकारच्या सक्तीच्या श्रमाला आणि अवैध वसूलीला नकार द्यावा. याशिवाय सरकार आणि मोठ्या भूस्वामींच्या अतिरिक्त जमिनी आणि धान्यकोठारांवर कब्जा करून गावातील गरिबांमध्ये वाटण्या केल्या. याच दरम्यान भारताच्या भांडवली राज्यसत्तेने निझामासोबत जैसे-थे करार केला आणि शेतकरी विद्रोहाला चिरडण्यासाठी निझामाच्या सेनेला हत्यार पुरवठा चालू केला. निझामाच्या सैन्याचा आणि रझाकारांचा सामना करण्यासाठी गावांमध्ये गनिमी काव्याची पथके (दलम) बनवले गेले ज्यांमध्ये दोन हजारांपासून दहा हजारांपर्यंत लोक सामील झाले आणि ज्यांना रायफल, रिव्हॉल्वर इत्यादी चालवण्याचे व्यवस्थित प्रशिक्षण दिले गेले. त्यांच्या मदतीने जवळपास तीन हजार गावांमध्ये ग्रामराज्य समित्या स्थापन केल्या गेल्या ज्या जमिन वितरण, शिक्षण, आरोग्य, आणि इतर ग्रामीण सेवांची देखरेख करत असत. या ग्रामराज्य समित्यांद्वारे तेलंगणाच्या 3 हजार गावांमध्ये जवळपास 10 लाख एकर जमिन आणि शेतीची उपकरणे तसेच गुरं गरिबांमध्ये वाटली गेली. शेतमजुरांची मजुरी वाढवली गेली. या संपूर्ण संघर्षादरम्यान जातीपातीची बंधने तोडण्यासाठी सुद्धा पुढाकार घेतला गेला आणि अस्पृश्यतेसारख्या प्रथांवर बंदी घातली गेली. ग्रामराज्य समित्यांमध्ये महिलांचा सुद्धा पूर्ण सहभाग असायाचा. या समित्या लोकांचे कौटुंबिक मामले आणि विवाह व घटस्फोटां संदर्भातील मामले सुद्धा सोडवत असत.

13 सप्टेंबर 1948 रोजी भारतीय सैन्याने ऑपरेशन पोलो द्वारे हैदराबाद मध्ये घुसून पाच दिवसांच्या आत निझामाला हैदराबादला भारतात विलीन करण्यास भाग पाडले. भारताच्या भांडवली राज्यसत्तेने निझामाला त्याचे विशेषाधिकार आणि प्रिव्ही पर्स (सरकारद्वारे दिला जाणारा विशेष भत्ता) सुद्धा कायम ठेवण्याचे आश्वासन दिले. भारताच्या राज्यघटनेने निझामाला राज्यप्रमुखाचा दर्जा सुद्धा दिला. निझामाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला शिक्षा दिली गेली नाही. रझाकारांचा प्रमुख असलेल्या कासिम रिझवीला सुद्धा तेवढी कडक शिक्षा दिली गेली नाही जेवढी अपेक्षित होती. हैदराबादच्या विलयाच्या दोन आठवड्यांच्या आतच भारतीय सेनेला खऱ्या उद्दिष्टाकरिता म्हणजे तेलंगणामध्ये कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या शेतकरी विद्रोहाला चिरडण्यासाठी कामाला लावले गेले.

**मज़दूर बिगुल (ऑगस्ट 2021) मधून साभार**

**अनुवाद:** निश्चय

# स्वतंत्र पत्रकारितेवर होत असलेल्या फॅसिस्ट हल्ल्यांविरोधात आवाज उठवा!

✎ **भारत**

गेल्या काही दिवसांमध्ये स्वतंत्र न्यूज चॅनेल्स (ऑनलाईन बातम्या देणारे चॅनेल्स) असलेल्या न्युजक्लिक आणि न्युजलाँड्रीच्या कार्यालयांवर इन्कमटॅक्स विभागाने धाडी टाकल्या. म्हणायला तर इन्कमटॅक्स विभाग या न्यूज चॅनेल्सकडे “सर्व्हे” करायला गेला होता परंतु हा कोणता सर्व्हे होता ज्यात इन्कम टॅक्स विभागाने या संस्थांचा आर्थिक अहवाल घेण्याऐवजी तेथे काम करणाऱ्या लोकांचे फोन आणि लॅपटॉप जप्त केले, त्यांची खाजगी माहिती गोळा केली? हे स्पष्ट आहे की इन्कम टॅक्स विभाग या चॅनेल्सचा आर्थिक अहवाल बनवण्यासाठी नाही तर तेथे काम करणाऱ्या लोकांना धमकावण्यासाठी आणि त्यांना गप्प बसवण्यासाठीच मोदी सरकारद्वारे तेथे पाठवला गेला होता. न्युजलाँड्री वर 2014 मध्ये सुद्धा धाड टाकली गेली होती, आणि यावर्षी फेब्रुवारीमध्ये न्युजक्लिकवर छापा मारला गेला.

मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला तीव्र झाला आहे. सरकारी धोरणांवर टीका करणाऱ्या या न्यूज पोर्टल्सवर हल्ले वाढले आहेत. हे ध्यानात ठेवले पाहिजे की मोदी सरकार सत्तेवर आल्यावर लगेचच एन.डी.टी.व्ही.वर एक दिवसांची बंदी आली होती. गोदी मीडिया चॅनेल्स सोडले तर सर्व मीडिया संस्था आज मोदी सरकारच्या डोळ्यात खुपणारे कुसळ झाले आहेत. आज काही मोजके स्वतंत्र मीडिया चॅनेल आहेत जे युट्युब आणि इतर सामाजिक प्रसारमाध्यमांद्वारे धर्मवादी भगव्या टोळ्यांचे सत्य दाखवतात आणि त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतात.

भांडवली मीडिया, ज्याला तसे तर भांडवली लोकशाहीचा चौथा खांब म्हटले जाते, आज सर्वांसमोर नागडा पडला आहे. सध्याच्या काळात तर गोदी मीडिया फक्त खोट्या बातम्या देणे, अश्लिल जाहिराती, धर्मवादी-अंधराष्ट्रवादी उन्मादाचा खुराक देणारी यंत्रणा बनला आहे. वाढती बेरोजगारी, महागाई सारख्या मुद्द्यांना समोर येऊ न देण्यासाठी भाजप सरकार सतत सर्व न्यूज चॅनेल्स आणि वर्तमानपत्रांचा वापर करून आपल्या फॅसिस्ट सांस्कृतिक राजकीय़ प्रचाराला वाढवण्याचे काम करत आहे. धर्मवाद, उन्माद, आणि अंधराष्ट्रवादाच्या प्रचाराद्वारे तो सामान्य जनतेच्या जीवनाच्या भौतिक आणि आर्थिक प्रश्नांना नजरेआड करत आहे. त्यांच्या या अजेंड्या विरोधात बोलणाऱ्या प्रत्येक आवाजाला ते निशाणा बनवत आहेत.

सरकारचे विचारधारात्मक उपकरणच फक्त जनतेच्या चेतनेचे निर्माण करत नाही; जनतेच्या जीवनाच्या स्थिती सर्वात अगोदर आणि निर्णायकरित्या जनतेच्या चेतनेचे निर्माण करतात. अशामध्ये जनता शोषण आणि अत्याचारा विरोधातील आपल्या अनुभवांच्या चेतनेने सज्ज होते. नक्कीच, अशा चेतनेच्या आधारावर ती स्वयंस्फूर्त पद्धतीचेच आंदोलन करू शकते, क्रांती नाही. या विरोधाच्या चेतनेला एका क्रांतिकारी प्रचाराद्वारेच व्यवस्थित रूप दिले जाऊ शकते. इथेच पर्यायी मीडियाचे कार्यभार येतात. वैकल्पिक मीडियाचा कार्यभार आहे जनतेला अशी व्याख्यांची संरचना उपलब्ध करावी जी सरकारद्वारे वापरल्या जाणाऱ्या विचारधारात्मक उपकरणांद्वारे दिल्या जाणाऱ्या व्याख्यांना नाकारू शकेल. आजच्या काळात जेव्हा देशातील जनता स्वतंत्र असूनही देशी-विदेशी भांडवलाच्या शोषणाची शिकार आहे, तेव्हा एका नव्या टोकापासून एका नव्या प्रकारच्या परिवर्तनकारी चेतनेला जन्माला घालणे गरजेचे आहे. याकरिता क्रांतिकारी विचारांनी सज्ज एका नव्या पर्यायी मीडियाची गरज आहे जो एकाप्रकारे अनुपस्थित आहे. त्यामुळे आज गरजेचे आहे की अशा सर्व घटनांचा जोरदार विरोध केला जावा. यासोबतच फॅसिस्टांच्या संपूर्ण सांस्कृतिक आणि राजकीय प्रचाराच्या मुळावर पावलोपावली हल्ले चढवावे लागतील आणि त्यांचे खरे चरित्र जनतेसमोर उघडे पाडावे लागेल. तेव्हाच फॅसिस्ट सरकारचे असे इरादे नेस्तनाबूत केले जाऊ शकतात.

भांडवलाच्या सेवेत आणि नफा कमावण्याच्या चढाओढीत गुंतलेल्या भांडवली मीडियाच्या वर्चस्वाच्या विरोधात एक पर्यायी क्रांतिकारी मीडीया उभे करण्याचे काम सुद्धा आपल्या समोर आहे. देशभरातील प्रगतिशील मीडिया संस्थांची मुख्य जबाबदारी ही आहे की आज त्यांना देशातील कामकरी जनतेशी जोडून घ्यावे लागेल, त्यांच्या समस्यांना तोंड फोडावे लागेल, तेव्हाच जाऊन या भांडवली मीडियाच्या घृणेच्या विषाच्या विरोधात जनतेच्या खऱ्या समस्या योग्य रूपात समोर येऊ लागतील आणि या फॅसिस्ट हल्ल्यांचे उत्तर आपण संघटितरित्या देऊ शकू.

**अनुवाद:** राहुल

## क्रांतिकारी शहीद साथी प्रीतिलता वड्डेदारच्या शहादत दिनाच्या (23 सप्टेंबर) निमित्ताने...

# प्रीतिलता वड्डेदार :चटगाव विद्रोहाची अमर सेनानी

कोणत्याही व्यक्तीसाठी आपल्या देशाकरिता प्राण देण्याचा मार्ग निवडण्यासाठी सर्वात पहिली महत्त्वाची गोष्ट आहे: प्रेरणा, उर्मी किंवा स्पिरीट. कोणत्याही व्यक्तीच्या क्रांतिकारी बनण्यात अनेक गोष्टींचे महत्त्व असते, त्यांची पार्श्वभूमी, अभ्यास, जीवनाची समज, तसेच सामाजिक जीवनाच्या कक्षा आणि बाजू. परंतु या सर्व परिस्थिती असतील आणि प्रेरणा किंवा स्पिरीट नसेल तर कोणताही व्यक्ती क्रांतीच्या मार्गावर अग्रेसर होऊ शकत नाही. देशासाठी प्राण देण्याची उर्मी ती शक्ती आहे जी विविध पार्श्वभूमीतून आलेल्या क्रांतिकारकांना एकमेकांवर तसेच जनतेवर अगाध विश्वास आणि प्रेम देते. आजच्या तरुण पिढीला सुद्धा आपल्या पूर्वजांबद्दल आणि त्यांच्या क्रांतिकारी प्रेरणेबद्दल काहीतरी माहिती नक्कीच असली पाहिजे.

आजच्या युवकांच्या मोठ्या हिश्श्यापर्यंत तर शिक्षणाची पोहोचच नाहीये आणि ज्यांच्यापर्यंत पोहोच आहे त्यांचा एक मोठा हिस्सा करियर बनवण्याच्या उंदीर-शर्यतीत धावत आहे. एका विद्वानाने म्हटले होते की उंदीर-शर्यतीची सर्वात मोठी समस्या ही आहे की या शर्यतीत जिंकल्यावरही तो उंदीरच राहतो; थोडक्यात माणसासारखे जगण्याची चिकाटी आणि हिंमत त्यामध्ये निर्माण होतच नाही.

तो जीवन जगण्याऐवजी आपले सारे जीवन, जीवन जगण्याच्या तयारीतच लावतो. नक्कीच याचे एक कारण आपला वसाहतिक गुलामीचा भूतकाळ सुद्धा आहे ज्यामध्ये दोनशे वर्षांच्या गुलामीने स्वतंत्र चिंतन आणि तर्कणेऐवजी आमच्या मेंदूला बौद्धिक गुलामीच्या बेड्यांमध्ये जखडून टाकले आहे. आजही आमचे युवक क्रांतिकारकांच्या जन्मदिनी वा शहादत दिनी 'सोशल मीडीयावर' फोटो टाकतात, पण या तरुण जनसमुदायाला बहुतेक करून क्रांतिकारी वारशाबद्दल काहीच माहित नसते किंवा अर्धवट माहिती असते. अशामध्ये सामाजिक परिवर्तनाच्या नियतकालिकांची जबाबदारी आहे की आजच्या युवकांना आपल्या गौरवशाली क्रांतिकारी वारशाचा परिचय द्यावा जेणेकरून ते येणाऱ्या काळात जनसंघर्षांमध्ये जनता आपल्या खऱ्या लोकनायकांपासून प्रेरणा घेऊ शकेल.

आज आम्ही अशाच एका क्रांतिकारक साथीचा जीवन परिचय देत आहोत जिने जनतेसाठीच्या संघर्षांमध्ये अत्यंत कमी वयात आपल्या प्राणांचे बलिदान दिले. प्रीतिलता वड्डेदारचा जन्म 5 मे 1911ला चटगाव येथे झाला. तिचे वडील जगतबंधू हे जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्याच्या कार्यालयात मोठे कारकून होते आणि आई प्रतिभामयी या 'महिला जागरण' मध्ये कार्यरत होत्या. प्रीतिलता वड्डेदार अत्यंत प्रतिभाशाली युवती होती. 1930 मध्ये तिने ढाका कॉलेज मधून 12 वी पास केली आणि कॉलेजमध्ये पहिली आली. शालेच जीवनातच



ती बालवीर संस्थेची सदस्य झाली होती. तिथे तिने सेवाभाव आणि शिस्तीचे धडे घेतले होते. बालवीर संस्थेच्या सदस्यांना ब्रिटीश सम्राटाप्रती एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागे. संस्थेचा हा नियम प्रीतिलतेला खटकत होता. तिच्या मनामध्ये बंडखोरीचे बीज येथूनच रूजले गेले. देशातील शेतकरी-कामगारांची दुर्दशा आणि त्यांचे इंग्रज सरकारद्वारे पाशवी शोषण, अत्याचार पाहून प्रीतिलतेच्या मनात काहूर उठले आणि तिने आपल्या प्रतिभेचा आणि क्षमतांचा वापर कारकीर्द घडवण्यासाठी नाही तर शौर्याने क्रांतिकारी मार्गावर चालण्यासाठी आणि जनतेच्या सेवेकरिता करणे योग्य समजले.

ती मास्टर सूर्यसेन यांच्या संपर्कात आली. मास्टर सूर्यसेन हे बंगालचे अग्रणी क्रांतिकारक होते. ते 1930 मध्ये झालेल्या चटगाव (आत्ताच्या बांग्लादेशामधील) शस्त्रागार छाप्याचे नेते होते. त्यांच्या छापामार पथकामध्ये अनेक युवक क्रांतिकारी सामील होते. मास्टर सूर्यसेन आणि त्यांचे छापामार पथक इंग्रजांवर हल्ले करून त्यांना जरब बसवू पहात होते आणि भारतातील युवकांना क्रांतिकरता जागवू पहात होते. सूर्यसेनच्या मागे सतत पोलिस हात धूवून लागले होते, त्यामूळे ते सतत लपत-छपत, पळापळीतच असत. त्यांना भेटणे जोखमीचे होते पण प्रीतिलता वेष बदलून त्यांना भेटायला जाई आणि त्यांचे आदेश संघटनेमध्ये लागू करवत असे. प्रीतिलतेने कॉलेज संपल्यावर आर्थिक तंगीमुळे शिक्षिकेची नोकरी सुद्धा केली आणि एका विद्वान शिक्षिकेच्या रुपात नावाजली गेली. शिक्षकी पेशातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा ती क्रांतिकारकांवर खर्च करत असे. 12 जून 1932 रोजी सूर्यसेन आपल्या साथीदारांसोबत गुप्त योजना बनवत असताना पोलिसांनी त्यांना घेरले. दोन्ही बाजूंनी गोळीबार चालू झाला. यामध्ये इंग्रज पोलिस कॅप्टन कॅमरान हा मारला गेला, अनेक क्रांतिकारक सुद्धा शहीद झाले पण मास्टर सूर्यसेन आणि प्रीतिलता पळून जाण्यात यशस्वी झाले. यानंतर प्रीतिलता पोलिसांच्या नजरेत खुपू लागली. पोलिसांनी प्रीतिलतेची खबर देणाऱ्याला मागेल तेवढ्या बक्षिसाची घोषणा केली. ही बातमी वर्तमानपत्रांमध्ये छापली गेली तेव्हा तिच्या आई-वडिलांना ती क्रांतिकारक असल्याचे समजले. यानंतर क्रांतिकारकांमध्ये प्रीतिलतेचा सन्मान बराच वाढला. मास्टर सूर्यसेन यांना आपल्या युवक महिला साथीच्या हिंमतीचा अभिमान होता. त्यांच्या लक्षात आले होते की प्रीतिलताने आपले जीवन देशाला अर्पण केले आहे. ती इराद्याची पक्की होती आणि तिचे ध्यान नेहमीच उद्दिष्टावर असायचे. ती एक मजबूत आणि समर्पित कमांडर बनली.

चटगाव मध्ये युरोपियन क्लब होता. तिथे इंग्रज अधिकारी संध्याकाळी नाचगाण्यासाठी आणि मनोरंजनासाठी येत असत. सूर्यसेनने या क्लबला उध्वस्त करण्याची योजना बनवली कारण क्रांतिकारकांना आश्रय देणाऱ्या एका महिलेला इंग्रजांनी गोळ्या घातल्या होत्या. प्रीतिलतेला हल्ल्याचे नेतृत्त्व सोपवले गेले. तिने सैनिकी वेशभूषा धारण केली आणि पिस्तुल आणि बॉंब घेऊन सज्ज झाली. सूर्यसेन आणि प्रीतिलतेला माहित होते की झुंझ तगडी होईल आणि इंग्रजही भारी पडू शकतात. ते प्रीतिलतेला पकडून तिच्याकडून संघटनेची रहस्ये काढण्याकरिता प्रयत्न करू शकतात. प्रीतिलतेने सोबत एक विषाची पुडीही ठेवली होती. पोलिसांनी घेरल्यास विष घेऊन प्राण देण्याचा तिने निश्चय केला होता. प्रीतिलतेसोबत महेंद्र चौधरी, सुशिला डे, प्रफुल्ल दास, प्रभात बल, मनोरंजन सेन सारखे क्रांतिनायक होते. याशिवाय पासष्ट युवक आणि युवती सुद्धा क्रांतिदलामध्ये सामील होत्या.

योजनेनुसार प्रीतिलतेने युरोपियन क्लबवर हल्ला केला. हल्ल्यामध्ये डझनभर इंग्रज अधिकारी जखमी झाले. एका महिलेचा मृत्यू झाल्याचे सुद्धा कळले. प्रीतिलतेने हिंमतीने हल्ला केला. हल्ला इतका घातक होता की कोणालाही सावरण्याची संधीच मिळाली नाही. प्रीतिलतेचे सर्व लक्ष आपल्या लक्ष्यावर होते. ती एका कमांडरप्रमाणेच वागत होती. इंग्रज पोलिस आणि क्रांतिकारकांमध्ये अनेक तास गोळीबार चालला. शेवटी क्रांतिकारकांच्या गोळ्या संपल्या आणि इंग्रज शिपायांनी त्यांना मारणे चालू केले. बघता-बघता क्रांतिकारकांचे देह पडू लागले. प्रीतिलतेला सुद्धा पोलिसांनी घेरले. तिला हे समजायला वेळ लागला नाही की आता वाचणे अवघड आहे. थोडाही वेळ न गमावता तिने त्वरीत विष तोंडामध्ये टाकले, 'इंकलाब जिंदाबाद' चा नारा दिला आणि आपले प्राण त्यागले. प्रीतिलतेच्या बलिदानानंतर इंग्रज अधिकाऱ्यांनी तलाशी घेतल्यावर मिळालेल्या पत्रात लिहिलेले होते की "चटगाव शस्त्रागार हल्ल्यानंतर जो मार्ग अवलंबला जाईल, तो भावी विद्रोहाचे प्राथमिक रूप असेल. हा संघर्ष भारताला पूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत चालूच राहिल."

**"मुक्तिकामी छात्रों-युवाओं का आह्वान" ,मे-जून 2016 मधून साभार**

**अनुवाद:** अभिजित.

# स्त्री विरोधी वाढते अत्याचार

**पान 16 वरून**

बलात्कार, अत्याचार समाजासमोर धरलेला तो आरसा आहेत जे समाजालाच त्याचा भेसूर चेहरा दाखवत आहेत! यातून हे सुद्धा दिसून येते की स्त्रीला सातच्या आत घरात म्हणणारी व्यवस्था, जी तिला स्वातंत्र्य नाकारते आणि पुरुषसत्तेच्या पंजाखाली ठेवू पाहते तीच तिला घराबाहेर असुरक्षितही बनवते! स्त्रीवर बंधन आणि अत्याचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत कारण दोन्हींमध्ये स्त्री देहावर पुरुषाचा अधिकार मानलेला आहे. तेव्हा बलात्काराच्या समस्येवर स्त्रीवर बंधन नाही, तर स्त्रियांना स्वातंत्र्य, समानतेचा अधिकार हेच असू शकते!

खाजगी मालकीच्या उदयासोबत कुटुंबव्यवस्थेला, स्त्रीवरील बंधनांना, स्त्रियांच्या गुलामीला सुरुवात झाली. एकीकडे स्त्रियांना देवीचे रूप म्हटले जाते तर दुसरीकडे पायी तुडवून तिच्यावर अमानुष अत्याचार केले जातात, हा फक्त दिखावी विरोधाभास नाही तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, ज्यात स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून, अस्तित्व नाकारणे समान आहे! जोपर्यंत ही पितृसत्ताक पद्धती आणि भोगवादी भांडवलशाही व्यवस्था आहे त्या व्यवस्थेत स्त्रियांची पूर्ण मुक्तीची अपेक्षा करणेही चुकीचं आहे. ह्यासाठी स्त्रियांना एकत्र येऊन, आपल्या हक्कांची जाणीव करून घेऊन, ते मिळवण्यासाठी लढावे तर लागेलच; परंतु जर संपूर्ण स्त्रीवर्ग म्हणजेच लोकसंख्येच्या निम्म्या भागाला मुक्ती हवी असेल, अत्याचारांपासून सुटका हवी असेल, तर शिक्षण, रोजगार, जोडीदार निवडीचे खरे स्वातंत्र्य, संपत्ती संबंध आणि आर्थिक बंधनांपासून मुक्ती देणारे क्रांतिकारी परिवर्तन घडवणे म्हणजे सध्या असलेली नफाकेंद्री व्यवस्था उलथवुन टाकून नवीन मानवकेंद्री व्यवस्था जन्माला घालण्या खेरीज दुसरा उपाय नाही.

# स्त्री विरोधी वाढते अत्याचार

## पितृसत्ताक समाज आणि भांडवलशाहीच जबाबदार!!

अश्विनी

गेल्या दोन दशकांपासून स्त्री विरोधी अत्याचार, बलात्कार, हिंसा या सर्व घटनांमध्ये अतोनात वाढ झाली आहे. बलात्कार झाल्यावर मारहाण करून खून करण्याचेही प्रमाण मोठ्या संख्येने वाढले आहे. दररोज वर्तमानपत्रात कुठे तरी कोपऱ्यात स्त्री विरोधी अपराधाची एक तरी बातमी आढळतेच. देशाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात हे घडतंच असते असे म्हणून अनेकजण सहज कानाडोळा करून जातात. पण देशातल्या एखाद्या कोपऱ्यातली ही बातमी जेव्हा आपल्या राज्याची, आपल्या गावाची इतकचं नाही तर आपल्या गल्लीतली, आपल्या वस्तीतली होऊन बसते तेव्हा मात्र अनेकांच्या पायाखालची जमीन सरकते.

ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात दिल्लीतील राबिया बलात्कार घटनेने बातम्यांची ही मालिका भांडवली मीडियात पुन्हा सुरू झाली. त्या घटनेबाबत दिल्लीत आंदोलने चालू असतानाच 31 ऑगस्ट रोजी पुण्यात दुसरी घटना घडली. 14 वर्षीय मुलगी मित्राची वाट पाहत रेल्वे स्थानकावर उभी असताना अज्ञात रिक्षाचालकाने खोटी माहिती देऊन तिचे अपहरण केले. आपल्या इतर मित्रांना सोबत घेतले व शहराच्या विविध भागात नेऊन दोन दिवस तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. या घटनेत सुरुवातीला रिक्षाचालक, रेल्वे कर्मचारी, व लॉज धारक अशा एकूण 14 लोकांना अटक केली गेली. घटनेचा खुलासा होत असताना एक एक माहिती समोर येऊ लागली. मुलीवर मुंबईतही बलात्कार झाले व एकूण आरोपींची संख्या 17 झाली आहे. सध्या जलदगती न्यायालयात (फास्ट्रॅक कोर्टात)खटला चालू आहे. ह्या घटनेविषयी चर्चा चालू असतानाच पुण्यातीलच खेड तालुक्यातील आणखी एक घटना घडली. 12 वर्षीय बालिकेवर 6 लिंगपिसाटांनी 2 ते 2.5 महिने लैंगिक अत्याचार केले. मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही हे अत्याचार केले गेले. पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवल्यावर 9 आरोपी अटकेत घेतले मात्र त्यातील 3 फरार झाले. महिलांवरील अत्याचाराचे हे सत्र सुरू असतानाच मुंबईत साकीनाका येथे दिल्लीतील निर्भया घटनेची पुनरावृत्ती झाली. 32 वर्षीय महिलेवर 45 वर्षीय नराधमाने एका टेंपोमध्ये बलात्कार केला, लोखंडी रॉडने मारहाण केली. एवढ्यावर भागले नाही तर महिलेच्या योनीत तोच लोखंडी रॉड खुपसून क्रूरतेचा कळस गाठला. उपचारादरम्यान अती रक्तस्रावामुळे महिलेचा मृत्यू झाला. घटनांमागून घटना वाढतच आहेत. उल्हासनगरमध्ये स्कायवॉक वरून जाणाऱ्या 15 वर्षीय मुलीच्या डोक्यावर हातोडा मारून एका नराधमाने तिचे अपहरण केले व स्टेशनबाहेर नेऊन झोपडीत तिच्यावर बलात्कार केला. दुसऱ्या एका घटनेत 13 सप्टेंबर रोजी ठाण्यातील 6 वर्षीय मुलीवर घरात एकटीच असल्याचा फायदा घेऊन मुलीच्या मामानेच बलात्कार केला. अमरावती व पालघरच्या घटनेत अनुक्रमे 17 व 15 वर्षे वयाच्या गर्भवती मुलींवर शेजाऱ्याने बलात्कार केले. बदनामीच्या भीतीने अमरावतीच्या युवतीने आत्महत्या केली. 11 ऑक्टोबर रोजी मुंबईत लोकलमध्ये 8 जणांनी सामुहिक बलात्कार केला आहे. झालेल्या सर्वच घटनांची माहिती द्यायला गेले तर जागा अपुरी पडेल. बलात्कार, स्त्रीअत्याचार हे रोजच्या जीवनाचे भयावह वास्तव बनले आहे.

उत्तर प्रदेशमधील हाथरस बलात्काराच्या घटनेला वर्ष पूर्ण होतंय. देशभरात ह्या घटनेचे तीव्र पडसाद उमटले, आंदोलने झालीत, राजकारण झाले पण काही दिवसानंतर जनतेचा राग मावळला. पुन्हा जो तो आपल्या घरात जाऊन बसला. दिल्लीनंतर कठूआ, उन्नाव, मुझफ्फरपूर, हाथरस, बलरामपूर ह्या ठिकाणी विविध बलात्काराच्या घटना आणि अमानुष कृत्ये घडली. अजूनही देशभरात विविध ठिकाणी अशा घटना घडत आहेत. मीडियाने लक्ष दिलेल्या थोड्या घटना तेवढ्यापुरते काहूर माजवतात, सामान्य जनता भडकून रस्त्यावर उतरते, एकत्र येऊन अशा घटनांना विरोध करते, त्या घटनांवर राजकारण होते, कडक कायदे केले पाहिजेत, फाशीसारख्या शिक्षांची वगैरे मागणी होते, पण शेवटी राग शांत झाल्यावर सगळे गप्प होतात. हे सत्र वर्षानुवर्ष असेच सुरू आहे, त्यात कुठे बदल होताना दिसत नाहीये की या कृत्यांवर कुठे लगाम बसताना दिसत नाहीये. उलट कैक पटींनी हे अत्याचार वाढतच आहेत.



स्त्रियांवरील अत्याचाराच्या बाबतीत इतिहासाचा थोडा अभ्यास केल्यास लक्षात येते की 2019 च्या वर्षभरात गेल्या वर्षाच्या म्हणजेच 2018 च्या घटनांपेक्षा 7 टक्क्यांनी वाढ झाली. 2018 मध्येच एकूण नोंदवले गेलेले स्त्री विरोधी अत्याचार 3,78,236 इतक्या मोठ्या संख्येत होते. 2020-2021 वर्षात तर त्यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. आणि त्यातही प्रामुख्याने जाणून घेण्याची बाब म्हणजे वर दर्शविलेली संख्या ही फक्त पोलिस स्टेशनला येऊन तक्रार नोंदवली गेली अशा घटनांची आहे. भारत हा सामाजिक सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेल्या विचारांचा देश आहे. जिथे महिलेवर घडलेला अत्याचार म्हणजे महिलेनेच केलेला गुन्हा आहे अथवा तिच्याच चुकीमुळे झालेला अत्याचार आहे असे बऱ्याच प्रकरणात समजले जाते, आणि त्यामुळेच गुन्हा नोंदवणे म्हणजे अत्याचारामुळे आधीच गेलेली अब्रू चार चौघात कशाला मांडायची, समाज काय म्हणेल ही भीती! गुन्हेगाराला दोषी न मानता पीडीतेलाच दोषी मानले जाते! त्यामुळे कित्येक घटना नोंदवल्याच जात नाहीत. ह्या सर्वच घटनांची सरासरी काढली तर भारतात दर दिवसाला सरासरी 87 बलात्काराच्या घटना घडतात. म्हणजे दर 17 मिनिटाला एक महिला लिंगपिसाटांच्या अत्याचाराला बळी पडते. बलात्कार आणि त्यानंतरचा खून हा अतिशय टोकाचा गुन्हा आहे आणि ह्या प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये भारत हा जगाच्या अव्वल स्थानावर पोचतो आहे. त्यामुळे गुन्हे आटोक्यात आणण्यासाठी कडक कायदे लागू करणे, वेळीच गुन्हेगारांना शिक्षा झाली पाहिजे ह्या मागण्या सामान्य जनतेकडून उचलल्या जातात, खुनाच्या शिक्षेचीही मागणी केली जाते. कडक शिक्षा तर झाल्या पाहिजेत, परंतु तेवढे पुरेसे नाही आणि फक्त शिक्षेने अशा प्रकारच्या गुन्हेगारीचे प्रमाण कमी होऊ शकत नाही, कारण गुन्ह्याचे कारण शिक्षेचा अभाव नसून समाजातील पितृसत्तात्मक, भेदभावकारी समाजव्यवस्था आणि लंपटगिरीला, बिभत्सतेला प्रोत्साहन देणारी भांडवली व्यवस्था आहे, हे समजणे आवश्यक आहे.

सध्या सत्तेवर असलेल्या मोदी सरकारच्या कारकिर्दीची सुरुवातच "बहुत हुआ नारी पर वार, अब की बार मोदी सरकार" असे म्हणत झाला आहे. याच सरकारने पुढे जाऊन "बेटी बचाव, बेटी पढाव", सारखा पितृसत्तात्मक नारा सुद्धा दिला आहे (बेटी बचाव म्हणण्यामध्ये पितृसत्ता आहे हे सुद्धा अनेकांना समजत नाही!). पण वास्तव हे आहे की मोदी सरकार सत्तेत आल्यापासून मात्र ह्या घटना वाढण्याला कुठलाच लगाम राहिला नाही. याचे एक कारण आहे की सत्तेत बसलेलेच बलात्कारी अथवा बलात्काऱ्यांचे पाठीराखे आहेत! कुलदीप सिंह सेंगर, चिन्मयानंद यासारखे फासिस्ट बलात्कारी या भाजपच्या सत्तेत सत्तेवर आहेत. उत्तरप्रदेशमध्ये "रामराज्य" आणू पाहणारे भाजपचेच योगी सरकार सत्तेवर असताना उन्नाव सारख्या घटनांमध्ये बलात्काऱ्याला वाचवण्यासाठी त्याच्याच समर्थनात रॅली काढली जाते. पोलिस प्रशासन सुद्धा अशा सत्ताधाऱ्यांच्या तालावर नाचत साधी घटना नोंदवून घ्यायलाही 8-8 दिवस लावतात. पीडितेच्या मृत्युनंतर परस्पर मृतदेह जाळायला ही ह्याच प्रशासनाचा, सत्तेचा पाठिंबा असतो. सत्ताधारीच जेथे बलात्काऱ्यांचे समर्थन करतात तेथे असे गुन्हे घडणार नाहीत तर काय?

1991 पासून आलेल्या नवीन आर्थिक नितीमुळे भारतात एकीकडे असा परजीवी वर्ग उदयाला आला जो सतत आर्थिक रित्या मजबूत होत आहे, ज्यात छोटे-मोठे उद्योगपती, दलाल, प्रॉपर्टी डीलर्स, सट्टेबाज यांच्यासारखा कष्ट न करता अपार कमाई करणाऱ्यांचा परजीवी वर्ग आहे ज्याची जीवनसंस्कृती चंगळवादीच आहे तर दुसरीकडे असेही वर्ग आहेत जे भांडवली व्यवस्थेच्या सांस्कृतिकरित्या अध:पतन झालेल्या विचारप्रणालीला आत्मसात करून, "खा, प्या व मजा करा" हे धोरण राबवत आहेत आणि स्त्री-पुरुष देहाला व्यापारवस्तू बनवणाऱ्या भांडवली संस्कृतीच्या अखिल विचारांचेही वाहक बनत आहेत. कामगार वर्गाचा आपल्या वर्गचेतनेपासून अलिप्त झालेला एक लंपट हिस्साही या विचारांना बळी पडत आहे. वस्तू जोपर्यंत उपयुक्त आहे तोपर्यंत वापरायची व काम झाल्यावर फेकून द्यायची हे तर निर्जीव वस्तुंबाबत ग्राह्य आहेच. परंतु हीच भोगवादी संस्कृती जेव्हा पितृसत्तेसोबत मिसळते तेव्हा स्त्रियांनाही एक उपभोगाची वस्तू "कमोडिटी" म्हणून दाखवण्याचा प्रचारही सुरू होतो. विविध जाहिरातींमधून, सिनेमांमधून स्त्री देहप्रदर्शन दाखवून स्त्रीला "माल" बनवून हा माल उपभोगण्याची रोगी मानसिकता देखील भांडवलशाहीनेच जन्माला घातली. त्यातून भयानक कुंठाग्रस्त मनोरुग्ण लोक तयार होत आहेत. परंपरेने तर स्त्रीला स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व असते हे मानलेच जात नाही आणि त्यात भोगवादी संस्कृती वापर करायचा व वापर झाल्यावर इतर वस्तूप्रमाणेच फेकून द्यायचे ही मानसिकता रूढ करत आहे. ही रोगी मानसिकता नफा आधारित मीडियाद्वारे सर्वत्र पसरवून संपूर्ण समाज रोगी बनण्याच्या वाटचालीवर आहे. एकीकडे हनी सिंग सारखे कलाकार आपल्या गाण्यांमधून तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात स्त्री विरोधी मानसिकता पसरविण्यास कारणीभूत आहेत, तर दुसरीकडे व्यापक प्रमाणात वितरित होणारी वर्तमानपत्रे आणि टीव्ही चॅनेल्स सुद्धा स्त्रिदेहाचे बाजारी प्रदर्शन करण्यात आणि लैंगिक भावना चेतावून धंदा वाढवण्यात मागे नाहीत. पतन इतके की पोर्नोग्राफी, वेश्यांचा बाजार हे तर विश्वव्यापी बाजारात नफा कमावून देणारे महत्वाचे साधन बनले आहे!

हजारो वर्षांपासून भारतात पितृसत्ताक समाजपद्धती रूढ आहे. वंशाचा दिवा तेवत ठेवणे ह्यासाठी मुल जन्माला घालणं आणि त्याला सांभाळणे हेच तिचे समाजाने घालून दिलेले प्रमुख कर्तव्य होते. मग ह्या पुरुष सत्तात्मक समाजात स्त्री म्हणजे पुरुषाच्या पायाखालची धूळ, घरदार सांभाळणारी मोलकरीण आणि मुल जन्माला घालण्याचे मशीन एवढेच तिचे अस्तित्व होते. जसजसा समाज पुढे गेला, स्त्रियांना स्वतःच्या अस्तित्वाची, गुलामीची जाणीव होऊ लागली, बंधनं झुगारून देण्यासाठी त्या पुढे आल्या तसतसे एका हिश्श्याला मर्यादित स्वातंत्र्य तर मिळाले पण दुसरीकडे चूल आणि मूलासोबतच नोकरीची तिसरी गुलामी सुद्धा अनेकींच्या माथी मारली गेली. असे असले तरी अत्याचारांमध्ये घट नाही तर वाढच झाली आहे. घरांमध्ये राहून अत्याचार - एका अहवालातील आकडेवारीनुसार समाजात वाढणाऱ्या ह्या घटनांमध्ये 70% घटना ह्या अशा असतात ज्यात महिलेच्या घरातील, नातेवाईकातीलच कोणीतरी, जवळच्या, ओळखीच्या व्यक्तीने तिच्यावर अत्याचार केलेला असतो. त्यामुळे स्वतःच्या घरात राहिली तर महिला सुरक्षित राहील हा तर्क कुठेही लागू होत नाही. खरेतर बलात्काराच्या अशा बहुसंख्य घटना समोर येतच नाहीत. घरांमध्ये होणारे हे

पान 15 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित